त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६४, अंक २-४, शक १९०७-०८

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 64, No. 2-4, Oct. 1985 – April 1986

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन नोव्हेंबर १९२० सालापासून सुरू झाले. त्रैमासिक मुख्यत्वेकरून भारताच्या इतिहासासंबंधी निरनिराळ्या भाषांतील मूळ, अस्सल ऐतिहासिक साधने उजेडात आणते. तसेच या इतिहासाच्या विविध अगांचा अभ्यास करणारे संशोधन-लेख प्रकाशित करते.

The Quarterly of the Bharata Itihasa Samshodhaka Mandala was started in November 1920. Since then the Quarterly has been publishing mainly original source material available in different languages, and also research articles relating to various aspects of Indian history and culture.

V. P. Bhagwat

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६४, अंक २-४, शक १९०७–०८

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 64, No. 2–4, Oct. 1985 – April 1986

ऋणनिर्देश : महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाकडून या अंकासाठी त्यांच्या नियमानुसार अनुदान मिळालेले आहे.

वार्षिक वर्गणी – रुपये दहा
जुलै १९८७

* * *

या नियतकालिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील विधानांची व मतांची जबाबदारी सर्वस्वी लेखकांकडे आहे. त्यांचे उत्तरदायित्व मंडळाकडे नाही.

* * *

प्रकाशक : म. श्री. माटे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
मुद्रक : मा. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

अनुक्रमणिका

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४ : २–४, ऑक्टो. १९८५-एप्रिल १९८६

ताम्रपाषाणयुगीन आहार : एक रासायनिक दृष्टिक्षेप

अनुपमा क्षीरसागर
डेक्कन कॉलेज, पुणे

आहार आणि रसायनशास्त्र यांचे नाते तसे पाहिले तर आपल्याला नवीन नाही. दुधात कॅल्शियम असते आणि पालेभाज्यांत लोह म्हणजे आयर्न असते हे आता सर्वसाधारणपणे सर्वांना माहीत असते. पुरातत्त्व आणि रसायनशास्त्र यांचा संबंध मात्र तसा अलीकडचा. उत्खननांतील माती, मातीची खापरे, मनुष्य वा इतर प्राणी यांचे सांगाडे या आणि इतरही काही अवशेषांचे रासायनिक पृथक्करण हे परिस्थितीजन्य पुराव्याहून थोडीफार अधिक माहिती देऊ शकते. मातीतील फॉस्फरसवरून वसाहतीची मर्यादा, लोकवस्तीचा तुलनात्मक अंदाज यांबद्दल, तर नैट्रोजनवरून गुरे बांधण्याची जागा इत्यादींविषयी मागोवा घेता येतो. मानवी वस्तीमुळे मातीत जे काही रासायनिक बदल घडून येतात ते हजारो वर्षे टिकून राहू शकतात; म्हणूनच काही ठराविक मूलद्रव्यांचा अभ्यास करून त्यावरून काही निष्कर्ष काढता येतात. मनुष्याच्या वा इतर प्राण्यांच्या हाडांमधील फ्लूरीन या मूलद्रव्याचा अभ्यास करून तुलनात्मक कालमापनासंबंधी माहिती मिळविता येते. या प्रकारचे प्रयोग आतापर्यंत इनामगाव येथील ताम्रपाषाणयुगीन वसाहतीवर करण्यात आले आहेत.

पुरातत्त्वातील रसायनशास्त्राचा यापुढील टप्पा म्हणजे उत्खननातील अवशेषांमध्ये आढळणाऱ्या अतिसूक्ष्म स्वरूपातील मूलद्रव्यांचे मापन करणे व त्यावरून माहिती मिळविणे. यातील एक भाग म्हणजे, आहार व रसायनशास्त्र यांतील नात्याचा धागा पकडून पुरातन काळातील मानवी सांगाड्यांमार्फत त्यांच्या आहारापर्यंत जाणे. तसे करता येणे शक्य आहे असे अलीकडील काही वर्षांत प्रयोगांद्वारे सिद्ध झालेले आहे. पुरातन मानवी सांगाड्यांमधील मुख्यत्वेकरून स्ट्राँशियम व त्याबरोबर झिंक, कॉपर, मँगेनीज, मॅग्नेशियम, आयर्न, लेड इत्यादी सूक्ष्म स्वरूपात आढळणाऱ्या मूलद्रव्यांचा अभ्यास पाश्चात्य देशांमध्ये गेल्या १५–२० वर्षांत मोठ्या प्रमाणावर सुरू झालेला आहे. Palaeodiet व Palaeopathology म्हणजेच पुरातन लोकांचा आहार व त्यांचे रोगनिदान या शाखेचा अभ्यास हा सूक्ष्म मूलद्रव्यांच्या आधारे केला जातो. यांतीय Palaeodiet मधील प्रयोगांमध्ये, मानवी

सांगाड्यात सूक्ष्म स्वरूपात असणाऱ्या मूलद्रव्यांचे मापन करण्यात येते. याचे कारण असे की, आहारातील काही ठराविक मूलद्रव्ये (जी त्या त्या आहारात जास्त प्रमाणात आढळतात) ही त्या आहाराच्या प्रमाणात मानवी हाडांमध्ये शोषिली जातात. त्यामुळे पुरातन मानवी सांगाड्यांमधील त्या विशिष्ट मूलद्रव्यांचे मापन करून मानवाच्या आहाराचा मागोवा घेता येतो. अशा रीतीने रसायनशास्त्र पुरातन मानवी आहाराविषयी निष्कर्ष काढण्यास मदत करते. अर्थात या प्रयोगांतील निष्कर्ष व पुरातत्त्वज्ञांनी दिलेले परिस्थितीजन्य आहारविषयक पुरावे यांचा एकत्र अभ्यास करूनच मग अनुमाने काढली जातात.

स्ट्रॉंशियम हे मूलद्रव्य शाकाहारामध्ये जास्त व मांसाहारात कमी असते. दुधात मात्र हे अत्यल्प प्रमाणात असल्याने शाकाहारातही दुधाचे प्रमाण जास्त असल्यास स्ट्रॉंशियमचे एकंदर प्रमाण कमी होऊ शकते. त्याचप्रमाणे मांसाहारात मासे खाण्याचे प्रमाण अधिक असल्यास स्ट्रॉंशियमचे प्रमाण अधिक होऊ शकते. कारण माशांमध्ये स्ट्रॉंशियम हे विपुल प्रमाणात आढळते. झिंक व कॉपर ही दोन मूलद्रव्ये मांसाहारात अधिक व शाकाहारात कमी असतात. मॅंगेनीज हे मूलद्रव्य शाकाहारात अधिक, परंतु त्यातही धान्यधुन्यापेक्षा झाडपाला, रानटी फळे यांमध्ये विशेष प्रमाणात अधिक असते. तेव्हा आहारविषयक अनुमाने काढताना या सर्व गोष्टींचा विचार करणे आवश्यक ठरते.

स्थूलमानाने हे प्रयोग, शाकाहार, मांसाहार, त्यातही मासे खाण्याचे प्रमाण, दूधदुभते इत्यादींचा तुलनात्मक अभ्यास करण्याकरता केले जातात. एकाच ठिकाणच्या परंतु भिन्न सांस्कृतिक कालांमधील अथवा काही विशिष्ट सामूहिक गटांमधील लोकांच्या आहाराची तुलना करण्याकरता याचा उपयोग होऊ शकतो. प्राचीन कालामध्ये भटक्या रानटी अवस्थेतून मानवाचे परिवर्तन शेती करणाऱ्या, गुरेढोरे पाळणाऱ्या व काहीशा स्थिर जीवन घालविणाऱ्या मनुष्यात झाले तेव्हा त्याच्या आहारातही साहजिकच फरक पडून तो मिश्रस्वरूपाचा झाला असणार. याच दृष्टिकोनातून हे प्रयोग महत्त्वाचे ठरू लागले. आफ्रिका, फिलिपाईन्स, उत्तर अमेरिका इत्यादी देशांत या दृष्टीने अभ्यासलेल्या पुरातन सांगाड्यांवरून असेही दिसून आले की एखाद्या लोकवस्तीमधील वसाहतप्रमुखाच्या वा श्रीमंत लोकांच्या आहारात मांसाहाराचे प्रमाण इतर लोकांहून अधिक होते. म्हणजेच मांसाहार हा प्रतिष्ठेचा समजला गेला असला पाहिजे. आता हे श्रीमंत वा प्रतिष्ठित लोक हे त्या सांगाड्यांजवळ सापडलेल्या अधिक चांगल्या प्रकारच्या वा संख्येने जास्त असणाऱ्या pottery वरून अथवा इतर अलंकारांवरून ओळखता येतात.

वरील दृष्टिकोनातून इनामगाव येथील उत्खननात सापडलेल्या मानवी सांगाड्यांच्या नमुन्यांवर प्रयोग करण्यात आलेले आहेत. मूलद्रव्यांचे सूक्ष्म स्वरूपातील मापन ppm म्हणजेच एक दशलक्षांश या परिमाणात करतात. म्हणजे एखाद्या

नमुन्यात १००० ppm इतके म्हणजे शेकडा ०.१% इतके भरते. अर्थात असे मापन करण्यासाठी खास उपकरणांची आवश्यकता असते. डेक्कन कॉलेजमध्ये आता Atomic Absorption spectrophotometer हे उपकरण उपलब्ध असल्याने अशा स्वरूपाचे प्रयोग करता येणे शक्य झाले आहे. डेक्कन कॉलेजचे संचालक प्रा. म. के. ढवळीकर यांच्या प्रोत्साहनामुळे, माझे वरिष्ठ सहकारी डॉ. गोगटे यांच्या समवेत मी या प्रयोगात भाग घेतला आहे.

इनामगाव येथील माळवा व आधीच्या जोर्वे संस्कृतीचा कालखंड सुमारे इ. पू. १६०० वर्षे ते १२०० वर्षे इतका होता. या कालखंडातील लोकांचे जीवन हे थोडेफार स्थिर व समृद्ध होते. मोठी चौकोनी घरे, मोठ्या प्रमाणावरील शेती, गुरे विशेषत: गाई, बैल अधिक प्रमाणात पाळणे हे त्यांचे वैशिष्टच. यापुढील नंतरचा जोर्वे कालखंड सुमारे इ. पू. १००० वर्षे ते ७०० वर्षेपर्यंत होता. यातील लोकांचे जीवन त्या मानाने कमी समृद्ध होते. याचे कारण कमी पावसामुळे शेती कमी होत गेली व गाईंची जागा हळूहळू शेळ्यामेंढ्यांनी घेतली. थोडीफार शेती, गुरे पाळणे, मासे पकडणे, लहान गोल घरे व काहीसे अस्थिर व भटक्या प्रवृत्तीचे जीवन हे या संस्कृतीचे विशेष. या दोन कालखंडांतील माणसांच्या जीवनात परिस्थितीने हळूहळू फरक पडत गेला. त्या त्या कालखंडात सापडणारी प्राण्यांची हाडे, मासे पकडण्याचे हूक्स, धान्यकण इ. वरून सर्वसाधारणपणे हा फरक पुरातत्त्वज्ञांनी उकलून सांगितला आहे. म्हणूनच तुलनेने समृद्ध असणाऱ्या आधीच्या जोर्वे काळातील व साधारण भटक्या प्रवृत्तीच्या नंतरच्या जोर्वे कालखंडामधील लोकांच्या आहाराचा तुलनात्मक अभ्यास करण्याच्या दृष्टीने सदर प्रयोग केले आहेत. अर्थात दोनही कालखंडांत आहार मिश्रस्वरूपाचा होता हे उघड आहे (कारण कापलेली हाडे दोन्ही कालखंडांत सापडतात). परंतु त्यातही त्यांच्या आहारातील फरक काही मूलद्रव्यांच्या मापनाने उघड करण्याचा प्रयत्न या प्रयोगाद्वारे करण्यात आला आहे.

वरील दोनही सांस्कृतिक काळांतील काही मानवी सांगाड्यांच्या नमुन्यांचे पृथक्करण करून त्यातील स्ट्रॉंशियम, झिंक, कॉपर व मँगेनीज या मूलद्रव्यांचे मापन करण्यात आले. यात असे आढळून आले की नंतरच्या जोर्वेमधील लोकांच्या सांगाड्यांत तुलनेने कॉपर व झिंक हे सरासरी अधिक प्रमाणात आहे. यावरून स्पष्ट दिसून येते की नंतरच्या जोर्वेमधील लोकांच्या आहारात मांसाहाराचे प्रमाण अधिक होते. स्ट्रॉंशियम हे मूलद्रव्य शाकाहारात अधिक व मांसाहारात कमी असे असताना आधीच्या शेतीप्रधान जोर्वे कालातील लोकांमध्ये ते कमी व नंतरच्या जोर्वेमधील लोकांत ते अधिक प्रमाणात सापडले. याची दोन प्रमुख कारणे म्हणजे, आधीच्या जोर्वे लोकांच्या आहारात दूधदुभत्याचा समावेश असल्याने त्यांच्या हाडात स्ट्रॉंशियम कमी झाले व दुसरे म्हणजे नंतरच्या जोर्वे

लोकांच्या आहारात मासे तुलनेने अधिक म्हणून स्ट्रॉंशियमचे प्रमाण मांसाहार जास्त असूनही त्यांच्या हाडात वाढले. अशा प्रकारे स्ट्रॉंशियमबद्दल विचार करून आहाराचे स्वरूप ठरविताना दूधदुभते, मासे इ. गोष्टींचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक ठरते. अर्थात हे सर्व निष्कर्ष परिस्थितिजन्य पुरावे लक्षात घेऊन काढलेले आहेत. कॉपर-झिंकचे प्रमाण वरील गोष्टीस दुजोरा देते. मॅंगेनीजचे प्रमाणही नंतरच्या जोर्वेतील लोकांमध्ये अधिक आढळते. हे लोक अधिक मांसाहारी असून शेती उत्पादन कमी असल्याने रानटी झाडपाला, फळे यांचा समावेश त्यांच्या आहारात अधिक असावा. म्हणून मॅंगेनीजचे प्रमाण तुलनेने त्यांच्या हाडात अधिक सापडले आहे.

एकंदरीत आधीच्या जोर्वेमधील लोकांचा आहार, मुख्यत्वे शेती उत्पादनांतील धान्ये, थोडाफार मांसाहार, दूधदुभते असा होता, तर नंतरच्या जोर्वेतील लोकांचा आहार मुख्यत्वे मांसाहार, मासे, रानटी झाडपाला, फळे व थोडेफार शेती उत्पादनापासून मिळणारे धान्य यांचा असावा, अशा प्रकारचे अनुमान काढता येईल.

समाजातील प्रतिष्ठित व इतर सामान्य लोक यांच्या आहारातील फरक या प्रयोगाद्वारे पडताळून पाहता येतो असे अनेक ठिकाणी झालेल्या प्रयोगांनी सिद्ध केले आहे. तसेच मांसाहार हा प्रतिष्ठेचा मानला गेला होता, असेही आढळून आले आहे. यासाठी इनामगाव येतील नंतरच्या जोर्वेमधील काही सांगाडे तपासण्यात आले. पुरातत्त्वज्ञांचे मते या कालखंडातील काही थोडे लोक हे इतर लोकांहून जास्त सुस्थितीत होते. या काळातील बहुतेक घरे गोल व लहान असली तरी काही घरे चौकोनी व मोठी आढळतात. वसाहतीच्या टेकडीच्या साधारण मध्यावर अशा महत्त्वाच्या व्यक्ती रहात असाव्यात असे दिसते. मृतांसमवेत पुरल्या गेलेल्या वस्तू व अलंकारांवरूनही त्या व्यक्तीचे त्या समाजातील उच्च-नीच स्थान ओळखता येते. तेव्हा अशी काही सुस्थितीतील माणसे त्या मोठ्या घरांमध्ये रहात असावीत. बाकीच्या छोट्या घरांमध्ये गरीब लोक रहात असावेत असे म्हणता येईल. या दोन समूहांमधील आहारविषयक फरक काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा श्रीमंत लोकांत मांसाहाराचे प्रमाण अधिक असावे असे आढळून आले. कारण त्यांच्या सांगाड्यांमध्ये कॉपर व झिंकचे प्रमाण अधिक व गरिबांच्या सांगाड्यांत स्ट्रॉंशिअमचे प्रमाण अधिक आढळले. याचप्रमाणे एकाच घरातील अनेक सांगाड्यांमधील मूलद्रव्यांचे प्रमाण जवळपास सारखेच आढळले. म्हणजे, एकाच घरातील लोकांमध्ये आहारात फारसा फरक नव्हता. एकाच घरातील स्त्री व पुरुष यांच्या आहारातही फारसा फरक आढळून आला नाही.

शेवटी, या प्रयोगांमधील आणखी एक भाग म्हणजे स्ट्रॉंशियम पृथक्करणावरून लहान मुलांचे दूध सोडून इतर घनाहार देण्याचे वय शोधून काढणे. दुधामध्ये

स्ट्राँशियमचे प्रमाण अत्यल्प असते व धान्ये, भाज्या इ. मध्ये त्याचे प्रमाण जास्त आढळते. तेव्हा ज्या वयात हाडांमधील स्ट्राँशियममध्ये वाढ दिसून येते ते वय शोधून काढण्याचे कारण समजावून घेऊ. भटक्या, रानटी अवस्थेतून मनुष्याचे परिवर्तन शेतीसाधनाकडे वळून काहीशा स्थिर अवस्थेत झाले तेव्हा अर्थातच तुलनेने लहान मुलांचा घनाहारही त्यामानाने लवकर सुरू झाला असणार. A reduction in weaning age is associated with shift from nomadic hunting economies to sedentary agricultural ones हे तत्त्व प्रयोगानी सिद्ध केले आहे. याचाच उपयोग करून आधीच्या जोर्वेत भरभराटीला असलेली शेती नंतरच्या जोर्वेत कमी झाली व मनुष्य काहीसा भटक्या अवस्थेत आला. तेव्हा साहजिकच लहान मुले थोडा अधिक काळ मातेच्या दुधावर अवलंबून असणार व आधीच्या जोर्वेच्या तुलनेत घनाहार उशिरा सुरू झाला असणार असे सिद्ध करता आले आहे. यासाठी लहान अर्भके ते ८ वर्षे वयाच्या मुलांच्या सांगाड्यांतील नमुने स्ट्राँशियमसाठी तपासले व असे दिसून आले की आधीच्या जोर्वेतील मुलांचा घनाहार हा नंतरच्या जोर्वेमधील मुलांपेक्षा लवकर सुरू झाला. यावरून नंतरच्या जोर्वेमधील लोकांची अवस्था ही अस्थिर व काहीशी भटक्या स्वरूपाची होती यास दुजोरा मिळतो.

आहारविषयक रासायनिक सिद्धांत, पुरातत्त्वातील प्रत्यक्ष पुरावे व रासायनिक प्रयोगांचे निष्कर्ष यांवर ही अनुमाने आधारित असल्याने त्यात त्रुटी असण्याचीही शक्यता आहे.

■ ■

Summary :

Food in the Copper-Stone Age : a chemicl analysis

The science of chemistry and the process of chemical analysis have assumed great importance in modern archaeological research. The chemical elements like phosphorus and nitrogen found in the archaeological remains enable an archaeologist to form ideas aboul the extent of human settlements, the places of cattle breeding etc. in ancient times. Similarly, an analysis and study of very minute basic chemical components like strontium, zink, copper and manganese found in human fossils give an idea of different kinds of food of man in olden times.

The present article makes a comparative study of the food habits of different classes in the human society during

the early (B. C. 1600–1200 B. C.) and later (B.C. 1000-B. C. 700) Jorve periods on the basis of chemical analysis of and the scientific experiments carried on the archaelogical remains found in the excavations at Inamgaon by the Archaeology Department of the Deccan College, Pune. From these experiments we know which particular class of the society (rich, poor etc) was vegetarian, which was non-vegetarian and which used milk in plenty. From the food habits of man a conjecture can be made whether the early and later Jorve civilizations were nomadic or stable, whether they were economically prosperous or led a hard life.

संदर्भ-सूची

Davidson Stanlay, R. Passmore, J. F. Brock, A. S. Truswell, 1975, *Human Nutrition and Dietetics*, English Language Book Service, Churchill Lingstone, Edinburgh and London.

Dhavalikar M. K., 1978, 'Early settlment and subsistence pattern in the Deccan,' *Recent Advances in Indopacific Prehistory Proc.*, International symposium.

Lambert J. B., Szpunar C. B. and Buikstra J. E., 1979, 'Chemical analysis of excavated human bone from Middle and Late Woodland sites,' *Archaeometry* 21, (2), 115-130.

Price T. D., Melissa Connor and John D. Parsen, 1985, 'Bone chemistry and the reconstruction of Diet Strontium Discrimination in White Tailed Deer,' *Journal of Archaeological Science* 12, 419–442.

Sillen Andrew and Maureen Kavanagh, 1982, Strontium and Palaeodietary Research : a review, *Yearbook of Physical Anthropology, 25: 67-90.*

Sillen Andrew and Patricia Smith, 1984, 'Weaning patterns as reflected in strontium-calcium ratios of juvenile skeletons,' *Journal of Archaeological Science 11, 237-245.*

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४:२-४, ऑक्टो. १९८५-एप्रिल १९८६

प्राचीन भारतातील देवदासी प्रथा

मीरा आरोळे
डेक्कन कॉलेज, पुणे

देवदासी म्हणजे एखाद्या देवतेला वाहिलेली मुलगी. देवालय स्वच्छ करणे, मूर्तीला वारा घालणे, देवापुढे नृत्यगायन करणे, देवाच्या मिरवणुकीत अग्रभागी नाचणे ही तिची नित्याची कामे होत. प्राचीन भारतात पूजेच्या वेळी देवतेला धूप, दीप, गंध, अक्षता, फुले, अन्न, पेय इ. अर्पण करण्यात येई. त्याचबरोबर देवाला शयनभोगही मिळावा, म्हणून मंदिरात दासी ठेवण्याचो प्रथा सुरू झाली. देवाची पत्नी म्हणून मुलींना देण्यात येई. त्यासाठी मंदिराचे व्यवस्थापक गणिकांना विकत घेत किंवा भाविक लोक अपत्यप्राप्तीकरिता किंवा अपत्य जगण्याकरिता पहिले मूल देवाला वाहण्याचा नवस करीत. देवदासी प्रथा धार्मिक श्रद्धेतून उगम पावली आहे. देवाच्या सेवेत जीवन घालवल्यामुळे पुण्य लाभून देहाचे सार्थक होईल, एवढीच भावना प्रारंभी लोकांच्या मनात होती. पण ज्याप्रमाणे देवाला अर्पण केलेले पूजोपचार त्याचा पुजारी स्वीकारतो आणि तरीही ते देवाला पावतात, त्याप्रमाणे पुजाऱ्याची सेवा केली तर तीही देवाला पावेल, अशी समजूत कालांतराने प्रसृत करण्यात आली. पुजाऱ्याने देवदासीचा उपभोग घेतला, तर तो देवानेच घेतला, अशी भावना पुढे हळूहळू उत्पन्न झाली. त्यामुळे देवाला अर्पण केलेल्या मुली व नर्तिका या पुजाऱ्यांच्या दासी बनल्या. राजे, सरदार व प्रतिष्ठित लोक यांच्या विलासासाठीही त्यांचा उपयोग होऊ लागला.

या देवदासी प्रथेचे तुरळक उल्लेख सोमदेवाच्या 'कथासरित्सागर'मध्येही आलेले आहेत.

लोहजङ्घ या ब्राह्मणाची गोष्ट सांगताना, मथुरा नावाच्या नगरीमध्ये रुपणिका नावाची वेश्या (वारविलासिनी) रहात होती आणि ती मंदिरात पूजेच्या वेळेला स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी जात असे, अशी हकीगत दिलेली आहे. 'पूजाकाले सुरकुलं स्वनियोगाय जातु सा।' (कथा. २.४.८०)

काञ्चनपूरची सुन्दरी नावाची वेश्या देवालयात नृत्य करत होती (कथा. १०.१.७५). या उल्लेखावरून, वेश्या ह्या मंदिरात जात असत इतकेच नव्हे, तर त्यांचा उदरनिर्वाह त्यावर अवलंबून होता, हे स्पष्ट होते.

दुसऱ्या एका कथेत श्रावस्तीचा राजा देवसेन हा एका व्यापाऱ्याची कन्या उन्मादिनी हिच्या प्रेमात पडतो. त्यानंतर तो आपल्या मंत्र्यांना तिची माहिती काढून आणण्यास सांगतो. मंत्री जेव्हा उन्मादिनीला पाहतात तेव्हा ते विचार करतात की राजाने जर इतक्या सुंदर मुलीशी विवाह केला तर राज्यकारभाराकडे त्याचे दुर्लक्ष होईल. तेव्हा मंत्री राजाला ती मुलगी कुलक्षणी असल्याचे खोटेच सांगतात. पुढे राजाचा सेनापती तिच्याशी लग्न करतो. काही दिवसांनी राजा उन्मादिनीला पाहतो आणि त्याचे राज्यकारभारातले लक्षच उडते. सेनापतीच्या ही गोष्ट लक्षात येते तेव्हा तो राजाला म्हणतो, 'मी उन्मादिनीला मंदिरात सोडतो. तेथे तुम्हीं तिचा स्वीकार करा.'

सा दासी न परस्त्रीति गृह्यतां यदि वाप्यहम् ।
त्यजामि तां देवकुले स्वीकरोतु ततः प्रभुः ।।

कथा ३.१.७६

राजा अर्थातच सेनापतीचा सल्ला स्वीकारत नाही. तो तिच्या वियोगाने प्राणत्याग करतो. पण वरील कथेवरून देवदासीशी किंवा मंदिरात सोडलेल्या स्त्रीशी जर लग्न केले तर ते तत्कालीन समाजात फारसे गर्ह्य मानले जात नसावे असे वाटते. अर्थात या गोष्टीमध्ये राजा तिला धर्मपत्नी म्हणून तिच्याशी विवाह करणार होता की केवळ एक अवरुद्धा म्हणून तिचा स्वीकार करणार होता हे स्पष्ट होऊ शकत नाही. म्हणजे देवदासीशी विवाह केला तर स्त्रीला कायदेशीर हक्क कोणते मिळत होते हे या गोष्टीवरून स्पष्ट होत नाही.

देवदासी प्रथा नक्की केव्हा सुरू झाली, ती किती प्राचीन आहे, हे प्रथम पहावे लागेल. त्यासाठी साहित्यिक वर्णने कशा प्रकारची आहेत आणि पुरातत्त्वीय पुरावा काय सांगतो हे आपण पाहू या.

साहित्यातील वर्णने

देवदासींचा संबंध अधिकाधिक नृत्याशी येतो. आणि नृत्यांगना या गणिका होत्या. त्यामुळे प्राचीन साहित्यांतून येणारे नृत्यांगना, गणिका यांचे उल्लेख कदाचित देवदासींचेही असू शकतील.

ऋग्वेदात भाऊ नसणाऱ्या मुली खूपदा वेश्याव्यवसायाकडे वळत असत असा उल्लेख आहे. (R. V. I. 124.. 7, IV. 5·5.; A. V. I 17.1).

अथर्ववेदातील 'पुंश्चली', 'महानग्नी' वगैरे शब्द गणिकांना अनुसरूनच असावेत (AV, XV. 2 etc.). पुंश्चली ही हौअर यांच्या मते सामान्य वेश्या नसून देवतेला वाहिलेली म्हणून पवित्र मानलेली होती. देवदासी प्रथेची ही कदाचित पहिली पायरी असू शकेल (J. W. Hauer, Der Vratya, pp. 144–149). ऋग्वेदात 'उषस' या देवतेचा नृत्यांगना म्हणूनच उल्लेख आढळतो (R. V. I. 92· 4; ·95.9). तसेच 'दासी' हा शब्द खालच्या

वर्गातील गणिका या अर्थाने वापरलेला दिसतो. काही विशिष्ट प्रसंगी ऋषींनी राजांना मुली (वधू) भेट म्हणून दिल्याचे उल्लेख आहेत. तसेच 'समन', 'गोष्ठी' अशा संस्थांमधून लोक एकत्रित जमत तेव्हा गणिकांच्या नाच-गाण्यांचे कार्यक्रम होत असत.

शांखायन आरण्यकात सांगितलेल्या एका धार्मिक विधीवरून, गणिकांना धार्मिक विधींमध्ये प्रतिष्ठित स्थान होते, असे वाटते.[1]

महाकाव्ये आणि पुराणांच्या काळात गणिकांना कायदेशीर मान्यता असून त्यांच्या उत्पत्तीच्या विविध गोष्टी सांगितल्या गेल्या. मत्स्य पुराणात (७०.२८–३०) याबाबत पुढील प्रकारे गोष्ट आलेली आहे:

देव आणि असुर यांच्या युद्धात असुरांच्या बायका विधवा झाल्या. काहींवर बलात्कार झाला. तेव्हा इंद्र म्हणाला की, अशा स्त्रियांनी राजाकडे दासी म्हणून रहावे किंवा मंदिरात (देवकुल) दासी म्हणून जावे. जो कोणी त्यांच्याकडे द्रव्य (शुल्क) घेऊन जाईल, त्यांच्याकडेच फक्त अशा स्त्रियांनी लक्ष द्यावे. अशा प्रकारे देवदासींचा उगम झाला. याबाबत काही विधींचा उल्लेखही या पुराणात आढळतो.

वेद, महाकाव्ये यांमध्ये येणारे उल्लेख हे गणिका किंवा वेश्यांचे आहेत. त्यांमध्ये या गणिकांचा 'देवदासी' या अर्थाने उल्लेख फार कमी आढळतो. वाङमयात देवदासींचा प्रथम उल्लेख येतो कौटिल्याच्या अर्थशास्त्रात (११३.२०). गणिका या अर्थी जे अनेक शब्द आलेले आहेत त्यामध्ये देवदासी हा शब्द आलेला आहे. त्या ठिकाणी असे म्हटले आहे की, देवदासी वृद्ध झाल्यावर त्यांना मंदिरात जाणे जर जमले नाही तर त्यांची नियुक्ती सूतकताई, लोकरकाम वगैरे कामांवर करावी.

भगवान बुद्धाच्या काळातही, बुद्धाने स्वत: वैशाली येथील आम्रपाली या गणिकेची भेट घेऊन तिला धर्माचा उपदेश केल्याचे विदितच आहे.

'चतुर्भाणी' हे चार भाग म्हणजे एकपात्री प्रयोग आहेत. त्यांमध्ये गणिकांच्या जीवनावर आधारित वर्णने आहेत. यामध्ये गणिका प्रद्युम्न, नारायण आणि कामदेवाच्या मंदिरात नाच-गाण्यासाठी आणि पूजेसाठी जात असल्याचे अनेक उल्लेख आहेत. हे 'चतुर्भाणी' मौर्यकालीन आहे असे मनमोहन घोष यांनी सिद्ध केलेले आहे,[2] तर डॉ. अग्रवाल आणि डॉ. मोतीचंद्र यांनी ते गुप्तकालीन असल्याचे म्हटले आहे.[3]

यानंतर दत्तकाचे 'वैशिकमधिकरणम्' आणि वात्स्यायनाचे 'कामसूत्र' वेश्याव्यवसायावर फार मोठा प्रकाश टाकतात.

त्यानंतर गुप्त कालखंडातील कालिदासाच्या 'मेघदूता'त उज्जैनीच्या महाकाल मंदिरात नृत्य करणाऱ्या नृत्यांगनांचा उल्लेख आहे (मेघदूत, १.३५).

'कुवलयमाला'मध्ये अवन्ती येथील मंदिरात विलासिनी नृत्य करीत

असल्याचे म्हटले आहे. त्या देवावर चवऱ्या ढाळत असत. त्यांच्या सुरेल आवाजाने मंदिराचे आवार भरून जाई (५०, ८३, ९३).

'कुट्टिनीयतम्' या ग्रंथात, देवदासी त्यांचा उदरनिर्वाह देवळातील मिळकतीवर करतात आणि त्यांचा धंदा हा आनुवंशिक (क्रमोपगतम्) असल्याचे म्हटले आहे. देवदासींचा व्यवसाय आनुवंशिक असल्याचा उल्लेख 'कथासरित्सागर'-मध्येही आहे. मकरदंष्ट्रा ही रुपिणिकेची आई, तिला धंद्याचे कसब समजावून सांगते. क्षेमेंद्राच्या 'समयमातृका'मध्ये, देवदासीला तिच्या सेवेच्या मोबदल्यात मंदिराकडून धान्य मिळत असल्याचे म्हटले आहे (८.८०).

'राजतरंगिणी'मध्ये देवदासीशी लग्न केल्याचे उदाहरण आहे. राजा दुर्लभक प्रतापादित्य एका व्यापाऱ्याच्या पत्नीच्या प्रेमात पडतो. मग तो व्यापारी आपल्या पत्नीला देवदासी म्हणून देवळात सोडतो. राजा तिच्याशी लग्न करतो. पुढे तिचा मुलगा ललितादित्य मुक्तापीड हा काश्मीरचा युवराज बनतो.

अशाच प्रकारची पण थोड्या फरकाने 'कथासरित्सागर' (९. २.१७०–३६९) मध्ये अनङ्गप्रभेची गोष्ट आलेली आहे. अनङ्गप्रभेचे सात प्रियकर होतात. नंतर ती सागरवर्मा नावाच्या राजाबरोबर लग्न करते आणि समुद्रवर्मा हा तिचा पुत्र युवराज बनतो.

पुरातत्त्वीय पुरावा :

पुरातत्त्वीय पुराव्यात मोहेंजोदडो येथील उत्खननात मिळालेली ब्राँझची नर्तिकेची मूर्ती देवदासीचे प्रतीक असू शकेल का ? पण याबाबतीत शंका व्यक्त करण्याव्यतिरिक्त आपण निश्चित असे काही सांगू शकत नाही. तसेच बारहूत, सांची, अमरावती वगैरे स्तूपांच्या बाहेर जी अप्सरांची शिल्पे आहेत त्यांतून नृत्यकलेविषयीची जाण आपल्याला दिसून येते आणि नृत्ये ही अर्थातच दरबारात किंवा मंदिरात करण्यात येत असत.

शिलालेख :

शिलालेख हा महत्त्वाचा पुरातत्त्वीय पुरावा होय. देवदासी प्रथेचा उल्लेख असणारा सर्वांत प्राचीन शिलालेख इ. स. पू. ३०० मधील असून तो रामगड येथील जोगीमारा गुंफेत मिळाला आहे. हा शिलालेख प्राकृत भाषेत आहे. एम्. बॉयर यांनी या शिलालेखाचे भाषांतर पुढीलप्रमाणे केले आहे :

"सुतनुका या देवदासीवर देवदिना या सुंदर आणि तरुण शिल्पकाराचे प्रेम होते."

या शिलालेखाचे भाषांतर टी. ब्लोच[४] यांनी, "सुतनुका नावाच्या देवदासीने ही गुंफा मुलींसाठी तयार केली; देवदिना हा चित्रकलेत प्रवीण होता" असे केले आहे.

या शिलालेखावरून इ. स. पू. ३०० मध्ये भारतात देवदासींची प्रथा रूढ होती इतकेच नव्हे तर त्यांचा उल्लेख शिलालेखांतून होण्याइतपत त्याना समाजात मानाचे स्थान होते, हे स्पष्ट होते. [५]

दुसरा शिलालेख मथुरा येथील असून तो इ. स. दुसऱ्या शतकातील आहे. या शिलालेखात लोणशोभिका या गणिकेच्या मुलीने अर्हतांसाठी गर्भगृह, प्रार्थनागृह, पाण्याचे टाके, दगडी कट्टा बांधल्याचा उल्लेख आहे. या शिलालेखावरून, गणिका केवळ वेश्यावृत्तीनेच न जगता धार्मिक वास्तूंच्या बांधकामातही खर्च करत असत, असे दिसते.

त्यानंतर इ. स. ८ व्या शतकात पट्टदकल (जि. विजापूर) येथील लोकमहादेवीच्या शिलालेखात एका देवदासीने देवाला एक घोडा आणि हत्तीचा रथ बक्षीस दिल्याचा उल्लेख आहे.

चोळ काळात देवदासी प्रथेला एक प्रकारचे संघटित रूप प्राप्त झाले होते. त्या काळातील बऱ्याचशा देवळांतून देवदासी असत. तंजावरच्या राजराजाने इ. स. १००४ मध्ये श्रीराजराजेश्वर मंदिरात इतर अनेक मंदिरातील देवदासींची बदली केल्याचे म्हटले आहे. मंदिरात एकूण ४०२ देवदासी होत्या. त्यांना नृत्य, गायन, वादन शिकविण्यासाठी शिक्षकही त्याच्या पदरी नोकरीला होते.

शिलाहार नृपती रट्टराज याच्या खारेपाटण शिलालेखात (शक संवत ९३० -सन १००८) दुर्गाच्या आत दारिका (देवदासी) तेली, कुंभार, माळी, धोबी यांची कुटुंबे यांचा (देवाच्या उपकरणार्थ) निर्देश आहे.[६]

परकीय प्रवासी-वृत्ते

आबू झईद अल् हसन या अरब प्रवाशाने इ. स. ८६७ मध्ये भारतास भेट दिली तेव्हा, भारतात देवदासी प्रथा चांगलीच रूढ असल्याचे म्हटले आहे.[७]

अल्बेरुणीने इ. स. १०३० मध्ये देवदासी प्रथेविषयी असे म्हटले आहे की, राजाला देवदासींपासून फार मोठे उत्पन्न मिळते आणि त्याचा उपयोग सैन्यासाठी केला जातो. त्यामुळे तत्कालीन राजांनी या प्रथेला फार मोठा पाठिंबा दिलेला होता.

गुजरातमध्ये देवदासींची संख्या बारा हजार असल्याचे बाराव्या शतकातील चौ-जु-कुआ या चिनी प्रवाशाने म्हटले आहे. तसेच राजस्थानातही त्यांचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर झालेला होता.

भारताबाहेरील देवदासी प्रथा

मध्य आणि पश्चिम आशियात देवदासी पद्धत फार मोठ्या प्रमाणावर असल्याचे स्ट्रॅबोने लिहून ठेवले आहे. पोटन्समधील कोमन येथील चंद्रदेवतेच्या मंदिरात देवदासींची गर्दी असे (Strabo XII, 559).

सिरियाच्या हेलिओ पोलिस आणि अर्मेनियाच्या अनाहिताच्या देवळातही त्या अस्तित्वात असल्याचे त्याने म्हटले आहे. या ठिकाणी कित्येक लोक त्यांच्या मुली देवळात वेश्याव्यवसायासाठी म्हणून देत आणि नंतर त्यांची लग्ने होत असत.

इजिप्त आणि अर्मेनियात तरुण मुली देवदासी म्हणून मंदिरात गणिकेचे जीवन जगत असत आणि नंतर त्या कोणत्याही पुरुषाशी लग्न करू शकत असत.

एखादी स्त्री जेव्हा देवदासी बनते तेव्हा तिच्या पूर्वायुष्यावर पडदा पडून तिच्या सर्वस्वी नवीन आयुष्याची सुरुवात होते आणि त्यामुळे तिच्याशी लग्न केले तरी चालते, ही कल्पना अर्मेनिया आणि इजिप्तमध्ये होती. 'कथासरित्सागर' मधील उन्मादिनीच्या कथेतही याच कल्पनेचे पडसाद दिसून येतात.

फरेझर यांनी (Golden Bough, verse 38) लिडियामधील ट्रॅलेस येथील एका शिलालेखावरून, आशियामायनरमध्ये इ. स. च्या दुसऱ्या शतकात ही प्रथा आनुवंशिकतेने चालू होती असे म्हटले आहे. या शिलालेखात असेही म्हटले आहे की औरेलिया एमिलिया नावाच्या स्त्रीनेच फक्त देवदासी बनून देवाची सेवा केली नाही, तर तिच्या आईने आणि इतर स्त्री नातेवाइकांनीही देवदासी म्हणून काम केले.

स्ट्रॅबोने प्राचीन इजिप्तमधील ॲमोन या देवतेच्या देवदासीविषयी लिहिले आहे की, कुमारिका त्या देवळात काही काळ सेवा करतात. त्यावेळी त्या देवाच्या पत्नी म्हणून ओळखल्या जातात. पण जेव्हा त्या दुसऱ्या कोणा पुरुषाशी लग्न करतात तेव्हा त्या देवाच्या पत्नी म्हणून मृत झाल्या असे समजून शोक करतात आणि मग त्यांचा विवाह दुसऱ्या पुरुषांशी होतो.

पुरातन काळी धर्माच्या नावाखाली चाललेल्या वेश्याव्यवसायाचे एक प्रतीक म्हणून बाबिलोनमधील मिलिटा देवीचे उदाहरण देतात. या देवीला विवाहबाह्य आयुष्याची आवड असे. अनिर्बंध वागणुकीचे प्रतीक म्हणून समजली गेलेली ही देवी आपल्या देवळात येणारा कोणीही पुरुष ज्या मुलीपाशी मागणी करील त्या मुलीने आपला देह देणगी म्हणून त्याच्या स्वाधीन करावा अशी आज्ञा करी, अशी समजूत होती. ही मागणी तिच्या नावाने तिच्याच देवळात पुरी करण्यात येई. इ. स. पू. ४४० चे सुमारास ग्रीक इतिहासकार हिरोडोटस व त्यानंर साडेतीन वर्षांनी ग्रीक प्रवासी स्ट्रॅबो यांनी ही परिस्थिती प्रत्यक्ष पाहिली होती असा उल्लेख आहे.[८]

मुलीचा विवाह झाला तरी तिच्यावर प्रथम समाजाचा अधिकार असल्याचे सांगून समाजाचा प्रतिनिधी म्हणून राजाने, धर्मगुरूने किंवा कोणी तिऱ्हाइताने प्रथम तिच्याशी शारीरिक संबंध करावयाचा आणि त्यानंतर नवऱ्याचा हक्क प्रस्थापित व्हावयाचा. पूर्व आशियात आणि दुसऱ्या अनेक रानटी जातींत धर्मगुरु देवाचे प्रतिनिधी म्हणून मुलीच्या विवाहानंतर प्रथम संबंधाचा हा हक्क उपभोगीत असत.[९]

कोणत्याही राष्ट्राचा प्राचीन इतिहास पाहिला तरी त्यात स्त्री–पुरुष संबंधाचा धर्माशी निकट संबंध जोडलेला दिसतो. विशेषत: स्त्रिया या गोष्टीकडे धार्मिक दृष्टीने पाहतात. म्हणून तरुण मुलींशी आपण प्रथम संबंध करून आपल्या प्रेमाने त्यांना पावन करतो असे पुजारी ढोंग करीत. मध्ययुगात फ्रान्समध्ये असे सामान्यत: मानीत की, ज्या स्त्रियांचा धर्मगुरूंशी शारीरिक संबंध होई, त्या त्यामुळे पवित्र होत. धर्मगुरूंच्या रखेल्यांनाही " पवित्र झालेल्या स्त्रिया " समजत.[१०]

अशा प्रकारची धर्माच्या नावाखाली चाललेली अनीती केवळ भारतातच नव्हे तर इतर देशांतही फार प्राचीन काळापासून चालू आहे. तीत शारीरिक संबंध म्हणजे देवासाठी केलेला स्वार्थत्याग किंवा देवाची सेवा अशी समजूत आहे.

मित्राला किंवा अतिथीला स्वत:ची पत्नी संभोगार्थ देण्याची चाल पुरातन कालापासून पाणिनीच्या कालापर्यंत भारतात होती. त्यातल्या त्यात ती दक्षिण हिंदुस्थानातील अनेक जातींत फार पुरातन काळापासून अस्तित्वात होती. अन्नमलयी डोंगर आणि दक्षिण कर्नाटक या भागातील मलायालम भाषा बोलणाऱ्या लोकांत ही चाल अगदी विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत चालू होती.[११]

वरील सर्व वर्णनावरून हे दिसून येईल की, देवदासी प्रथा ही इ. स. पू. तिसऱ्या शतकात केवळ भारतातच नव्हे तर जगात सर्वत्र पसरलेली होती. त्याचे ठोस पुरावे आपल्याला शिलालेख, शिल्पे, साहित्य यांतून मिळतात आणि ' कथासरित्सागर ' ही त्यास अपवाद नाही.

■ ■

Summary

The custom of Devadasi in ancieut India :

The term ' Devadasi ' means a girl or a woman who is dedicated to the service of god by the society. The custom has its origin in the popular belief that by serving God the girl becomes holy and her life becomes fruitful. In the early period of Indian history, the devadasis were looked upon as 'women of god '. But gradually they became victims of the sexual passions of religious and political leaders in the Indian society.

The present article attempts to trace the origin of the custom of Devadasi by means of references to that custom found in different old Sanskrit and Prakrit treatises and inscriptions from the Vedic time upto the early medieval period of the Shilahara kings. The article also makes use of

the travel accounts of foreign travellers who visited India during ancient and early medieval period. After discussing the social status of Devadasis during different periods, the article gives valuable information regarding the custom of Devadasis in ancient Egypt, Armenia and medieval France by producing evidence from the historical accounts of Strabo and Herodotus.

संदर्भ

1. Keith, A. B., '*The Sānkhāyāna Aranyaka*, Intr., VIII-XI, London, 1908.

२. Ghosh M., *Glimpses of Sexual Life in Nanda Maurya India*, Calcutta, 1975.

३. Motichandra, Agrawal, V. S. शृंगारहाट, मुंबई, १९५८.

४. *Archaeological Survey of India*, *Annual Report*, Delhi, 1903-4, p. 122.

५. Ph. Vogel, *Catalogue of the Archaeological Museum at Mathura*, Allahabad, 1910, pp., 184-86

६. मिराशी वा. वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख (नागपूर-१९७४), पृ. २३१.

७. K. A. Nilakanta Sastri, *The Cholas.*, 2nd ed. Madras, 1955, p. 554.

८. नाईक पु. गो., वेश्या व वेश्याव्यवसाय, मुंबई, १९४८, पृ. १५.

९. V. F. Caverton and Samuel D. Schmalhausen, *Sex in civilization*, p. 44.

१०. Iwan Bloch M. D., *The Sexual Life of Our Time*, p. 100.

११. नाईक, पूर्वोक्त, पृ. १६.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४ : २-४, ऑक्टो. १९८५-एप्रिल १९८६

रहाटगाडगे

म. श्री. माटे
डेक्कन कॉलेज, पुणे

एखादी गोष्ट त्याच क्रमाने सतत चालत असली तर आपण 'रहाटगाडगे' चाललेच आहे असे म्हणून जातो. एकापाठोपाठ एक गाडगी पाणी भरून वर येणार, रहाटाभोवती फिरून रिकामी होणार आणि पुन्हा पाणी वर आणण्यासाठी विहिरीत जाणार असे हे चक्र सतत चालू राहते. मराठी भाषेत इतके दृढमूल झालेले रहाटगाडगे महाराष्ट्रात आज क्वचितच पहावयास मिळते. साधारणपणे आपण रहाट म्हणतो तो निराळ्याच प्रकारातला. एक मोठे रीळ आणि ते फिरवले की दोर त्याच्या भोवती गुंडाळला जातो आणि पाण्याने भरलेली बादली किंवा घडा वर येतो. पण रहाटगाडग्याला अनेक गाडगी एकाच वेळी लावलेली असतात– एका साखळीत. त्यामुळे पाणी सतत उपसले जाते, प्रवाहात सातत्य राहते. दुसरे म्हणजे रहाट किंवा रीळ हे माणसाला फिरवण्यासारखे असते, तर रहाटगाडगे हे बैल किंवा उंट यांच्या साहाय्याने फिरवले जाते. तिसरा महत्त्वाचा फरक असा की येथे गतीची दिशा बदलण्याची व्यवस्था केलेली असते. बैल किंवा उंट जमिनीवर फिरतात. म्हणजे त्यांची गती जमिनीला समांतर असते. दात्यांच्या साहाय्याने दोन चाके एकमेकाशी काटकोनात बसवून या समांतर गतीचा रोख नव्वद अंशाने बदलतात. चाके जमिनीसरशी फिरण्याऐवजी जमिनीशी काटकोनात फिरतात. आणि त्यांच्याबरोबर गाडग्यांची माळही. उपलब्ध इंग्रजी साहित्यात या रहाट-गाडग्याला 'Persian wheel' असे सर्वत्र म्हटलेले आहे. स्वाभाविकच हे यंत्र इराणातून इकडे आले असावे असा समज झालेला आहे. इस्लामी कालखंडात आपल्याकडे मोठाल्या नगरांत भुयारी खापरी नळांवाटे घराघरातून पाणी आण-ण्याची व्यवस्था झाली. अठराव्या शतकातसुद्धा या नळांना जापानी म्हणजे जहापन्ही नळ म्हणत. म्हणजे ती व्यवस्था परकी किंवा इराणी होती हे सामान्य-पणे सर्वांना मान्य होते. पण आपल्या संस्कृत व प्राकृत साहित्यात ओदयंत्र, वारि-यंत्र अशासारखे शब्द अनेकदा येतात. त्यांचा ओळीने निर्देश करतो. §

§ दौलताबादेच्या पाणीपुरवठ्याचा शोध घेताना या सगळ्या प्रश्नाकडे जास्त लक्ष द्यावे लागले. या संशोधनात मला अनेक सहकाऱ्यांची मदत होत आहे. हा

(१) ' गाथासप्तशती ' या ग्रंथात दुर्जनांचे वर्णन करताना रहाटगाडग्याची उपमा दिली आहे. ' रहट्टघडिअ ' हा शब्द तर वापरलेला आहेच, पण त्या यंत्राची कल्पना यावी इतके स्पष्ट वर्णन आहे. रहाटाच्या गाडग्यांत पाणी भरलेले असते तोवर त्यांची तोंड वर असतात आणि ती रिकामी झाली की माना खाली घालतात. दुर्जनांचे वर्तन असेच असते.

(२) अभीर राजा ईश्वरसेन याच्या नाशिकच्या गुंफालेखात, त्याने काही व्यापारी श्रेणींच्याकडे मोठाल्या रकमा ठेवी म्हणून ठेवल्याची माहिती आहे. या रकमांचा म्हणजे त्यांच्या व्याजाचा उपयोग लोकोपयोगी कामासाठी व्हावा ही कल्पना अध्याहृत आहेच. अशा श्रेणींमध्ये ' ओदयांत्रिकां 'च्या श्रेणीचा उल्लेख आहे. २००० कर्षापण यांच्याकडे ठेव म्हणून ठेवले होते. ओदयांत्रिक याचा नेमका अर्थ काय काढावयाचा हे विवाद्य ठरेलही. म्हणजे पाण्यासंबंधीची यंत्रे तयार करणारे असा अर्थ घ्यावयाचा की स्थापत्यविशारद असा घ्यावयाचा हे समजत नाही. हे दोन्ही उल्लेख इसवी सनाच्या प्रारंभीचे आहेत.

(३) यापूर्वीचे मौर्यकालापासूनचे तलाव व कालवे यांचे उल्लेख आहेत. सौराष्ट्रात सुदर्शन तलाव होता. वाकाटकांनी त्याच नावाचा तलाव खणला होता. ओरिसात खारवेल राजाने कालवे खणले होते. असे अनेक उल्लेख सापडतात.

(४) अकराव्या-बाराव्या शतकात शिल्पासंबंधीच्या ग्रंथांत वारियंत्रांचा उल्लेख आहे. वर्णने अत्यंत त्रोटक आहेत. त्यामुळे यंत्रांचे स्वरूप नीटसे ध्यानात येत नाही. एका बाबतीत ग्रंथकार सांगतो की कमळाच्या आकाराचे मोठे आसन तयार करावे. त्याच्या आठ पाकळ्यांवर आठ पुतळ्या उभ्या कराव्यात. मध्यभागी राजा किंवा राणी बसतील आणि नंतर त्या पुतळ्यांच्या हातातल्या कलशातून त्यांच्यावर पाणी उडेल. म्हणजे आतून तोटचा नेण्याची आणि पाणी बऱ्याच उंचावर साठवण्याची व्यवस्था असली पाहिजे. पण हा अंदाज झाला.

जुन्या काळची प्रत्यक्ष रहाटगाडगी हाती लागण्याची शक्यता नाही. भारहुत, सांची, अमरावती इथल्या शिल्पांत रोजच्या जीवनातले अनेक प्रसंग कोरलेले आहेत–रानातले, शहरातले, झोपडीतले तसेच राजवाड्यातले. घरे, देवळे सगळे

[पृष्ठ १९ वरून टीप पुढे चालू]

छोटासा निबंध मला तयार करता आला त्याचे श्रेय मी माझ्या विद्यार्थिनी व सहकारी डॉ. कमल चव्हाण यांना देईन. ख्रिस्ती शकाच्या प्रारंभीच्या काळातले काही उल्लेख त्यांनी माझ्या निदर्शनास आणले, तसेच डॉ. सिंग यांनी १९७७ च्या अ. भा. इ. परिषदेत वाचलेला प्राचीन पाणीपुरवठ्यासंबंधीचा एक निबंध त्यांनी मला दाखविला. शिलालेखाचा नेमका पत्ता माझ्या सहकारी डॉ. सौ. शोभना गोखले यांनी सांगितला. त्या दोघींचाही मी आभारी आहे.

आहे. मिरवणुकीने जाणारे हत्ती–घोडे आहेत. त्यांच्या पाठीवरची झूल, निशाणे, कोठे बैलगाडचा असा हरतऱ्हेचा तपशील दिसतो, पण यात कोठेही रहाट-गाडग्याचे रेखाटन नाही. अजंठचाला एवढा मोठा चित्रपट आहे. त्यातही रोजच्या जीवनातल्या अनेक घडामोडी आहेत, वस्तू आहेत, पण रहाटगाडग्याचे चित्र नाही. रहाटगाडग्याचे अगदी यथातथ्य दर्शन सोळाव्या–सतराव्या शतकातील एका लघु-चित्रात घडते. पण तो फार पुढचा काळ झाला. प्राचीन काळाची तड लावणे जरूर होते, म्हणून सिंग यांनी केलेल्या एका उल्लेखाचा मागोवा घेतला.

सिंग यांनी, ॲलन या नाणकशास्त्रज्ञाने पंचमार्क्ड नाण्यांवरच्या एका ग्रंथात नाण्यांवरचे एक चित्र किंवा चिन्ह हे कदाचित पर्शियन व्हील असावे अशी सूचना केल्याचा उल्लेख दिला आहे. म्हणून याच ग्रंथातील सगळचा चिन्हांचे मी बारकाईने निरीक्षण केले, तेव्हा चार–पाच चिन्हांनी माझे लक्ष वेधून घेतले. ती चिन्हे पुढीलप्रमाणे—

१. सहा किंवा आठ आऱ्यांचे चाक. हे आरे चाकाच्या धावेच्या थोडे बाहेर आलेले व त्यांच्या टोकाला घडचासारखे पदार्थ बसवलेले. हेच ॲलनचे पर्शियन व्हील.

२. अनेक नाण्यांवर दिसणारी, मराठी ४ च्या आकडचासारखी आकृती. ह्या आकृतीला किंवा चिन्हाला नाणकशास्त्रज्ञ taunne symbol किंवा वृषभचिन्ह म्हणतात. बैलाचे निदर्शक असे हे चिन्ह समजण्यात येते. या चिन्हाचा लावलेला अर्थ चुकीचा आहे असे मला वाटते. प्रत्यक्षात ते कुंभाचे, कलशाचे किंवा घडचाचे चित्र आहे. तो भाग थोडा पुढे बघू. सध्या त्यांना वृषभचिन्हेच म्हणू.

३. एक वर्तुळ आणि त्याच्या भोवती चार वृषभचिन्हे, म्हणजे चार बैल.

४. स्वस्तिक व स्वस्तिकाच्या प्रत्येक टोकावर एक वृषभचिन्ह–चार बैल.

५. वर्तुळ व त्याभोवती एकाच दिशेला तोंड करून सहा वृषभचिन्हे म्हणजे सहा बैल.

६. गुडघ्यावर टेकून (रांगल्यासारखा) जाणारा माणूस. त्याच्यासमोर दोन वृषभचिन्हे–दोन बैल, एकामागोमाग एक.

७. बैलाचे चित्र आणि त्याच्यासमोर वृषभचिन्ह म्हणजे एक स्वाभाविक रीतीने रेखाटलेला बैल आणि दुसरा संक्षिप्त स्वरूपात.

हे वृषभचिन्ह आहे असे धरले तर यातल्या एकाही चित्राचा अर्थ लागत नाही. बैलासमोर वृषभचिन्ह कशाला? त्याऐवजी बैलासमोर पाण्याने भरलेला घडा किंवा भांडे आहे असे समजणे अधिक सयुक्तिक ठरेल. बैलांना हाकणारा माणूस ओणव्याने, रांगत जात आहे असे समजण्यापेक्षा नदीकाठावर दोन घडे भरून घेत आहे, असे समजणे बरोबर ठरेल. स्वस्तिकाच्या व वर्तुळाच्या भोवती कलशांची

स्थापना करणे म्हणजेच निरनिराळ्या मंडलांवर कलशस्थापना करणे अधिक स्वीकार्य ठरेल. आजही अशीच करतात. आणि एकाच वर्तुळाभोवतीच्या आकृती म्हणजे गाडगी आहेत, बैल नव्हेत हे सहज समजेल.

या चिन्हांचा बोध होण्याच्या दृष्टीने वृषभचिन्हाऐवजी कलश किंवा घडा हा अर्थ जास्त समर्पक ठरेल हे या उदाहरणावरून स्पष्ट होईलच. पण केवळ एवढ्यावरतीच थांबण्याचे कारण नाही. या नाण्यांवर कोणकोणती चिन्हे येतात हे पाहिले तर असे दिसते की त्यांवर स्तूप, बोधीवृक्ष, सूर्य, चंद्र, सिंह, हत्ती, घोडा, बैल, चक्र, स्वस्तिक ही चिन्हें आहेत. तत्कालीन भारतीय कलेत ही सगळी चिन्हे आहेत. भारुथ, सांची, अमरावती इ. ठिकाणी ह्या सगळ्यांच्या बरोबरीने कलश सर्वत्र आढळतो. नाणी पाडणारांनी कलेतील इतर सर्व चिन्हे पत्करली पण कलश कशासाठी वगळला ? 'वृषभचिन्ह' हा अर्थ सोडला आणि तो कलश आहे हे पत्करले तर हा विसंवाद नाहीसा होतो.

नाण्यांवरचे जे चिन्ह आहे ते एका प्रकारच्या रहाटाचे आहे. एका मोठ्या व्यासाच्या चाकाभोवती घडे बांधण्यात येत. हे चाक प्रवाहाच्या वेगाने फिरे. वर येताना घडे पाणी घेऊन येत आणि परतताना रिकामे होत. याला Water wheel असे नाव असून ते अनेक ठिकाणी वापरात आहे.

रहाटगाडग्याला–साकी–Persian Wheel याला आवश्यक ते सर्व ज्ञान व तंत्र आपल्याकडे होते हेच या नाण्यांवरून दिसते आणि म्हणून विहिरीतले पाणी उपसून उंचावर चढविणे आणि ते सतत पुरवणे ही दोन्ही कामे प्राचीन भारतात सिद्ध झालेली होती असे म्हणावयास अडचण भासू नये.

■ ■

संदर्भ ग्रंथ

१. जोगळेकर स. आ., गाथासप्तशती (पुणे, १९५६), ४९०, पृ. ३२५.

२. Singh, V. P., " Irrigation in the Deccan, 200 BC.–200 A. D.", Report of the prcceedings of the Indian History Congress, Vol XXXVIII, Bhuvaneshvar, pp. 33–45.

3. Shukla D. N., *Samarargana Sutradhara*, Vol. 1, (Chandigarh, 1963), p. 234.

4. Allan, *Catalogue of the coins of ancient India*, London, p. XXXII

5. Mirashi V. V., " Nasik cave inscription of Ishwarasena : Year 9. " Corpus inscriptionum Indicarum, Vol. IV, Part 1, (Ootacmund., 1955), pp. 3–4.

Summary

Rahatagadge

Some years back, a device known in Marathi as *Rahātagadge* was used in the villages in Maharashtra for drawing water from wells. This device worked on the principle of what is known as the Persian Wheel. As many scholars and researchers think that the ancient Indians did not know the mechanism and the principle behind the working of the Persian Wheel, they infer that the device *rahata-gadge* came to India from Persia. The present article quotes referecnces to *rahatagadge* in original authentic documentary, incriptional and numismatic sources on ancient Indian history and concludes that the ancient Indians were acquainted with the principle behind the mechanism and working of the Persian Wheel.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४ : २–४, ऑक्टो. १९८५-एप्रिल १९८६

क्षत्रियांच्या शहाण्णव कुळींची कूळकथा

उषा रानडे
डेक्कन कॉलेज, पुणे

आपला इतिहास हा फार प्राचीन आहे. त्यातल्या अनेक घटनांचा अर्थ लावायचा म्हटले तर फार मागे मागे जावे लागते. नदीचे मूळ व ऋषीचे कूळ शोधू नाही म्हटले तरी ते बोलण्यापुरतेच. प्रत्यक्षात त्या घटनांच्या उगमाचा शोध घ्यावाच लागतो. महाराष्ट्रातील 'क्षत्रियांची शहाण्णव कुळे' ही अशीच एक कल्पना आहे. तिच्या उगमाचा शोध घेताना रामायण महाभारतापलीकडे जावे लागते आणि हाती काय येते तर क्षत्रियांची ९६ कुळे ही एक Myth आहे. ह्याला इतिहास पुराणांचा दाखला पुरेसा ठरत नाही. याला वास्तवाचा आधार शोधावा लागतो व तो फार थोडा आहे. या संकल्पनेचे मूळ हिंदुधर्मातील जातीव्यवस्थेत सापडते असे दिसते. थोडक्यात, ज्यांना ज्यांना राज्य करण्याची, प्रत्यक्ष राजा होण्याची संधि मिळाली त्या त्या प्रत्येकाने आपण अस्सल क्षत्रिय आहोत हे दाखवण्याची धडपड केली आहे. याचे कारणही, आपल्या शास्त्रपरंपरेप्रमाणे राज्य करण्याचा, मुख्यत: करवसुलीचा अधिकार क्षत्रियांना होता, तसेच लोकरक्षणाची जबाबदारी त्यांचीच होती. या प्रक्रियेचा, औरसत्व सिद्ध करण्याच्या प्रक्रियेचा, मध्ययुगातील महाराष्ट्रातला तरी आधार म्हणजे क्षत्रियांची ९६ कुळे. या कुळींच्या कथेचा आरंभ करण्यापूर्वी, ज्याच्या निमित्ताने ही कूळकथा मी लिहिली त्या एका छत्रपतीच्या शिलालेखाचा उल्लेख करायलाच हवा. तो म्हणजे तंजावर शिलालेखाचा.

शिवाजीचा सावत्रभाऊ व्यंकोजी हा तंजावरला राज्य करीत असे. याच्याच घराण्यातील एक विद्वान छत्रपती दुसरा सरफोजी याने आपल्या काळात तंजावर येथील बृहदीश्वराच्या देवळाच्या प्राकारावर लेख कोरविला. हा लेख म्हणजे भोसले यांचा कुलवृत्तांत. हा लेख सरफोजीचा चिटणीस बाबुराय याने १३ डिसेंबर इ. स. १८०३ रोजी लिहिला. या लेखात भोसले घराण्याचा इतिहास देताना एक प्रसंग असा आहे : दक्षिणेत औरंगजेबाने निजामशाहावर स्वारी केली व त्याला जिंकले. नंतर अली आदिलशाहालाही नेस्तनाबूत केले. या दोन्ही लढायांनंतर औरंगजेब देवगिरीकडे गेला व शाहजी आपल्या वतनाच्या गावी राहण्याचे निमित्त

करून जवळच्या प्रदेशातील किल्ले व मुलूख हळूहळू जिंकून घेऊ लागला. शाहजीच्या शौर्याची कल्पना असल्याने ९६ कुळींचे सर्व मराठे सरदार हळूहळू त्याच्या आधिपत्याखाली एकत्र आले असे सांगून लेखकाने शाहण्णव कुळांची नावे दिली आहेत (प्रत्यक्षात ९५). हा क्षत्रियवंश सूर्यवंश, चंद्रवंश व ब्रह्मवंश यांपासून वृद्धीस लागला असे म्हणून लेखकाने तीनही वंशांची उत्पत्ती आणि नंतर ९६ कुळांची यादी खालीलप्रमाणे दिली आहे :

सूर्यवंश	सोमवंश	ब्रह्मा
राम	चंद्र	मरीची
लव — कुश	बुध	कश्यप
	आयु	सूर्यनारायण
	नहुष	वैवस्वत मनू
	ययाति	उत्तानपाद
	पुरु	दांभिक
		सहालेक

या तीन वंशांपासून ९६ कुळांचा विस्तार झाला तरी यातली सूर्यवंशातील, चंद्रवंशातील व ब्रह्मवंशातील नेमकी कोणती याचे वर्गीकरण लेखकाने दिलेले नाही. यात आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ज्या छत्रपतीनी हा इतिहास कोरवला त्यांचे घराणे ' भोसले' हे रजपुतांचे वंशज होते असेही तो म्हणत नाही. उलट तो भोसले वंशाचा आदिमूळपुरुष श्रीमन्नारायण, त्या परंपरेने सूर्यनारायण–मनु–इक्ष्वाकु, ज्या परंपरेत कृत, त्रेता, द्वापार या तीन युगांतही प्रख्यात पुण्यश्लोक राजे जाहले, त्या वंशात प्रस्तुत कलियुगात शंभुपर्वत प्रदेशी....राजा शंभू म्हणून अवतरला अशी हकीगत देतो.

लेखकाने या संदर्भात दिलेली ९६ कुळींच्या क्षत्रियांची यादी पाहिल्यावर प्रा. ग. ह. खरे यांच्याशी मी चर्चा केली तेव्हा अशा अनेक याद्या उपलब्ध असल्याचे त्यांच्याकडून कळले. मराठ्यांच्या ९६ कुळींचा पहिला उल्लेख महालिंगदासाच्या ' सिंहासनबत्तिशी 'त असल्याची नोंदही मला सापडली. शिलालेखातली यादी १८०३ सालातील आहे. साहजिकच याला समकालीन, यापूर्वीच्या व नंतरच्या याद्यांची तुलना करणे जरुरीचे होते. तेव्हा शिलालेखापूर्वीच्या साधारण

१७५० च्या आसपासच्या दोन याद्या श्री. पुरंदरे यांना भाटांकडून मिळाल्या होत्या, त्या मंडळाचे अंकात (मध्ययुगीन भारत, भाग ३) प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या शिलालेखातील यादी, गॅझेटियर (१८८५) बॉम्बे प्रेसिडेन्सी (सूर्यचंद्र यदुशेष इ. ४ वंश) व ज्ञानकोशकार केतकरांची, संकेतकोशातील (हणमंते) या चार पाच याद्यांची तुलना केल्यावर असे आढळले की केवळ आठ दहा नावातच ध्वनिसाम्य आहे व उरलेली ऐंशी, पंच्याऐंशी नावे भिन्न आहेत. क्षत्रियांची ९६ कुळे महाराष्ट्रात इतकी प्रसिद्ध असून अनेक वर्षे चालत आलेली असताना असा फरक का व्हावा ? बारकाईने वाचल्यावर असे दिसले की तंजावर शिलालेखात निंबाळकर असे नाव आहे तर अनेक याद्यांत पाटणकर आहे. ही नावे गावावरून पडलेली दिसतात. पण याद्यात इतका फरक दिसल्यावर आता शोध करायचा तो ९६ या आकड्याचा. हा आकडा कसा आला ? हा विचार करताना शिवराज्याभिषेकाच्या प्रसंगाचे स्मरण झाले.

शिवाजी हा मराठा हिंदू राजा असूनही त्याचे क्षत्रियत्व सिद्ध करण्यासाठी गागाभट्टाने भोसले यांच्या कुलाचा रजपुतांच्या सिसोदिया कुलाशी संबंध सिद्ध केला आहे. आणि साताराच्या प्रतापसिंहाने अगदी अलीकडील काळात याची खातरजमा केली. तेव्हा रजपुतांशी या कुळाचा संबंध आहे का ? म्हणून राजस्थानच्या इतिहासाकडे लक्ष वळवले तेव्हा असे दिसले, की राजस्तानचा इतिहास लिहिणारा कर्नल टॉड व इतरांनी या विषयावर अभ्यास करून रजपुतांची मुख्य ३६ कुले व ६० उपकुले असल्याची नोंद केली आहे. म्हणजे मराठा क्षत्रियांनी ९६ हा आकडा रजपूत कुळांवरून घेतला असावा.

राजपूत या शब्दाची व्युत्पत्ती म्ह. राजाचे पुत्र. ते तर क्षत्रिय असणारच आणि म्हणून रजपुतांचे आपण वंशज असे मराठ्यांनी म्हणणे ओघानेच आले. तेव्हा रजपूतांचा इतिहास पाहताना त्यांच्या या ९६ कुळीचा उगम प्रथम केव्हा झाला याचा शोध घेत असताना असे दिसते की–

कल्हणाच्या ‘ राजतरंगिणी ’त इ. स. ११५० च्या सुमारास रजपुतांच्या ३६ कुळींचा उल्लेख आला आहे तो असा–

> प्रख्यापयनाः संभूतिं षट्त्रिंशत कुलेषु ये ।
> तेजस्विनो स्वभावतोऽपि सहन्ते नोच्चकैः स्थितिम् ॥
> तेऽप्यन्तेऽनन्तपालाद्यः राजपुत्राः तमत्यजन् ॥

‘ राजतरंगिणी ’लाच समकालीन अशा आणखी काही ग्रंथांतून रजपुतांच्या ३६ कुळीच्या याद्या एकत्र केल्या आणि त्यांचा तुलनात्मक अभ्यास केला तेव्हा खालील गोष्टी नजरेस आल्या :

(१) चंद्र या भाटाने लिहिलेला ‘ पृथ्वीराजरासो ’ बाराव्या शतकातील आहे. याचप्रमाणे (२) ‘ कुमारपालचरित ’ या (११५० ते ७५) या ग्रंथातही

रजपुतांच्या ३६ कुळींची नावे आहेत. (३) महालिंगदासाची ' सिंहासनबत्तिशी ' हा ग्रंथ म्हणजे संस्कृत ' सिंहासनद्वात्रिंशिका ' या ग्रंथाचे मराठीकरण. याचा काल शक १४८७. या ग्रंथात विक्रमाला कोणते रजपूत राजे येऊन मिळाले याचे वर्णन करताना लेखकाने रजपुतांच्या प्रमुख कुळी कोणत्या व उपकुळी कोणत्या याचे वर्णन केले आहे (भा. इ. सं. म. वार्षिक इतिवृत्त, शक १८३५– गो. का. चांदोरकर). मराठ्यांच्या ९६ कुळांच्या याद्यांप्रमाणे या चारही ग्रंथातील व इतर उपलब्ध असणाऱ्या याद्यांतील रजपुतांच्या कुळींची तुलना केल्यावर त्यातही सोमवंशी, सूर्यवंशी, यदु अशा ८, १० नावांत ध्वनिसाम्य दिसते तर इतर अनेक नावे वेगळी आलेली आहे. टॉडने तर स्वतःची एक स्वतंत्र यादी दिली आहे. पण या कशातही साम्य नाही. महालिंगदासाने मात्र एक पुस्ती आपल्या विवेचनात जोडली आहे. तो म्हणतो, आता ' उपकुळे सांगेन त्यांसी द्यावे जी अवधान। छत्तिसामाजी आडनावे जाण परोपरींची ॥९१॥ जैसे स्थानी बैसले तेचि अडनांव पावले। अथवा करणीस्तव जाले नानाकुळाचे ॥ ९२ ॥ (यात त्याने केवळ रजपुतांची नावे न देता इतर अनेक जातींची त्याच्या काळात रूढ असणारी नावे दिली आहेत). यांपैकी या रजपूत कुळीही सूर्य, चंद्र व अग्निकुळातील आहेत असे दिसते. तेव्हा या अभ्यासाचा पुढचा टप्पा म्हणजे मराठ्यांच्या ९६ कुळींच्या याद्या व रजपुतांच्या ९६ कुळींच्या याद्या यांचा तौलनिक अभ्यास करणे. या याद्यांमधूनही सोमवंशी, सूर्यवंशी, यदु अशी सात-आठ नावे ध्वनिसाम्य दाखवतात. याचा अर्थ असा आहे की महाराष्ट्रात भोसल्यांसारखी काही रजपूत क्षत्रिय घराणी व्यवसायाच्या निमित्ताने दक्षिणेत आली असतीलही. तसेच मराठे क्षत्रिय राजस्थानात गेले असतील. पण म्हणून त्यावरून महाराष्ट्रातले सर्वच क्षत्रिय हे रजपुतांचे वंशज समजायचे का ? यातून फक्त एकाच गोष्टीचा उलगडा होतो. तो म्हणजे मराठा क्षत्रिय व रजपूत क्षत्रिय या दोघांनीही ९६ कुळे ही संकल्पना मानली होती.

मराठ्यांनी आपण रजपुतांचे वंशज आहोत असे मानण्याचे दुसरे तात्कालिक कारण असे दिसते की १३ व्या शतकानंतर मुसलमानी अंमल भारतात स्थिर झाला. या आक्रमणाला यशस्वीरीत्या तोंड देणारे हिंदू राज्यकर्ते ते रजपूत म्हणून तेच क्षत्रिय अशी सर्वांची धारणा झाल्याने, आपण त्यांचे वंशज आहोत हे पुढच्या राजांनी सिद्ध करण्याची धडपड केलेली दिसते.

आता रजपूत कोणाचे वंशज आहेत असे पाहिले तर ते स्वतःला सूर्यकुळातील व चंद्रकुळातील वंशज समजतात. ' पृथ्वीराजरासो ' व इतरत्र ही वंशावळ आहे :

सूर्य
राम
कुश — लव
कुश → कछवाह → मारवाड
लव → मेवाड, अंबर

चंद्र
युधिष्ठिर — जरासंध
युधिष्ठिर → पृथ्वीराज २२५० वर्षे
जरासंध → १३६ वर्षांची वंशावळ

परंतु नुसत्या राजांच्या नावांच्या याद्या आहेत. कोण कुणाचा, त्यांची ऐतिहासिक कारकीर्द, त्यांचे संबंध या तपशिलाची माहिती मिळत नाही. क्वचित ठिकाणी १००० वर्षांच्या कालखंडाची माहिती मिळत नाही. म्हणजेच यांचे वंशसातत्य दिसत नाही.

आता रजपूत स्वतःला मूळचे सूर्य चंद्र कुलांतील म्हणवत असले, तरी ते वर्णन त्या त्या राजांच्या भाटांनी केलेले वर्णन आहे. ते क्षत्रियवृत्तीचे, क्षात्रधर्माचे पालन करीत होते. म्हणून ते क्षत्रिय होते हे बरोबर. परंतु मानववंशशास्त्रज्ञांच्या शोधाप्रमाणे ते शक, हूण असावेत. तेव्हा वंशसातत्याचा अभाव कदाचित या राजपूत राजांना जाणवत असावा आणि जन्माने प्रत्यक्ष आपले क्षत्रियत्व सिद्ध झाल्याखेरीज आपला क्षत्रियत्वाचा अधिकार पक्का होणार नाही हे ओळखून भाटांमार्फत या राजांनी आपला रामायण महाभारताशी संबंध जोडला व ह्यानेही भागेना तेव्हा त्यापलीकडे जाऊन सूर्यचंद्राशी जोडला.

तेव्हा (१) अस्सल क्षत्रिय हा सूर्य किंवा चंद्रवंशीय असला पाहिजे ही एक कल्पना; (२) राज्यकर्ता हा क्षत्रियच असला पाहिजे हा धर्मशास्त्राचा नियम; (३) काहीशा ऐतिहासिक अपघाताने रजपूतांच्या ३६ मुख्य व साठ उपकुळी असणे ही कल्पना; (४) महाराष्ट्रातील काही क्षत्रिय घराण्यांचा राजपुतांशी प्रत्यक्ष संबंध असण्याची शक्यता व (५) मध्ययुगात अस्सल क्षत्रिय म्हणजे केवळ राजपुतच ही उत्पन्न झालेली समजूत. इतक्या गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे मराठा क्षत्रियांत ९६ कुळे हा आकडा कसा आला, त्यांना राजपुतांशी संबंध दाखविण्याची गरज का भासली व रजपूत काय आणि मराठे काय सर्वांना सूर्य चंद्र वंशात आपले मूळ शोधण्याची आवश्यकता का वाटली या उलटसुलट प्रवासाचा अर्थ लागायला लागतो.

■ ■

Summary

The origin of ninety-six Khatriya families

The term 'Shahannava Kuli' (ninety-six families of Maratha Kshatriyas) is very famous in Maratha history. For some unknown reason, the Maratha Kshatriyas were not considered as genuine Kshatriyas by the brahmin class in Maharashtra during Shivaji's coronation. Gagabhatta had to establish the relation of Shivaji's Bhosale family with the Rajput Shisode family of Udepur in Rajastan. The most interesting thing is that almost all prominent Maratha families tried to establish their relation with the Rajputs and also with Surya, Chandra, Shesha and Brahma Kulas of pre-Ramayana and pre-Mahabharata times. This is evident from different lists of medieval and British periods which give names of ninety-six Maratha families. A comparative study of these lists show that except for the names of a few families, the names of other families vary in different lists.

Why did the Maratha families try to esthblish their connection with the Rajputs of distant Rajastan ? That is because the Rajputs were considred to be the only real khatriyas in nedievel India. The reason seems to be that they ruled over Delhi for a long time and they were the first to offer stiff opposition to the Muslim invaders.

Why did the Marathas insist on the number ninety-six to prove their kshatriyahood ? The reason is obvious. They considered the Rajputs to be the only genuine Khatriyas. According to Kalhan's 'Rajatarangini', Chandra's 'Prithviraj-raso, Mahalingadasa's 'Simhasanabattishi' and Col. Tod, the Rajputs had thirty-six Khatriya kulas and sixty upa-kulas. The Rajputs also claimed that they were the descendants of Somavamsha, Suryavamsha, Yadu vamsha etc. So the natural inference is that the Marathas, who claimed the Rajput descent for proving their Khariyahood, imitated the Rajputs in preparing the lists of Maratha Khatriyas.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४ : २-४, ऑक्टो. १९८५-एप्रिल १९८६

दुसरा मुहम्मद आदिलशाह याच्यासंबंधीचा एक अप्रकाशित ताम्रपट

मा. रा. कंटक व एस. जे. मंगलम्
डेक्कन कॉलेज, पुणे

दुसरा मुहम्मद आदिलशाह याच्यासंबंधीचा एक ताम्रपट* काही वर्षांपूर्वी रत्नागिरी जिल्ह्यातल्या लांजे तालुक्यातील साटवली या गावी सापडला. हा ताम्रपट इ. १६४० च्या सुमाराचा असून अप्रकाशित आहे. त्यात पंधरा ओळींचा देवनागरी लिपीतील मराठी मजकूर कोरलेला आहे. दुसऱ्या मुहम्मद आदिलशहाने कोकणातील सुलतान नावाच्या बंदरात नवीन बांधल्या गेलेल्या श्रीविठ्ठलाच्या एका देवालयाला वृत्ती नेमून दिली, तिच्यासंबंधीचा हा ताम्रपट आहे. या घटनेसंबंधी ताम्रपटात जी हकीगत दिलेली आहे ती अशी :

शके १५६१ मध्ये प्रमाथी संवत्सरात, कार्तिक शु. ५ ला, गुरुवारी, मूळ नक्षत्र असताना (इंग्रजी तारखेप्रमाणे २१ ऑक्टोबर १६३९ रोजी) सुलतानी बंदरात श्रीविठ्ठलाचे देऊळ बांधण्यास सुरुवात झाली. शके १५६२ मध्ये विक्रम संवत्सरात, वैशाख शु. ११ ला, बुधवारी, उत्तरा फाल्गुनी नक्षत्र असताना, (इंग्रजी तारखेप्रमाणे २२ एप्रिल १६४० रोजी) देऊळ पूर्ण होऊन, राघो पाध्ये, गुर्जर व

*सध्या हा ताम्रपट रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली या गावी राहणाऱ्या श्री. अण्णा श्रीगावकर यांच्या संग्रहात आहे. सुमारे पाचसहा वर्षांपूर्वी, हे गृहस्थ दापोलीचे पंचायत-अध्यक्ष असताना, त्यांनी सदरहू ताम्रपट पुण्यातल्या डेक्कन कॉलेजमधील संशोधिका डॉ. सौ. शोभना गोखले यांना आणून दाखविला. सौ. गोखले यांनी आम्हाला या ताम्रपटाचे वाचन व अभ्यास करण्यास अनुमती दिली. आम्ही या ताम्रपटाचे वाचन करून त्यावर डेक्कन कॉलेजच्या बुलेटिनमध्ये (खंड ४६, इ. १९८७) इंग्रजीत एक लेख लिहिला. ताम्रपटाचे अचूक वाचन करण्यात व त्याच्यातील मजकुराचा अर्थ लावण्यात कै. प्रा. ग. ह. खरे यांची आम्हांला खूपच मदत झाली. त्यांचे व सौ. शोभनाबाई गोखले यांचे आम्ही ऋणी आहोत. डेक्कन कॉलेज बुलेटिनमधील लेखापेक्षा या ताम्रपटाचा बराच वेगळा अन्वयार्थ प्रस्तुत लेखात डॉ. मा. रा. कंटक यांनी लावला आहे.

महादेवभट नवाथे या ब्राह्मणांनी त्यावर कळसाची स्थापना (कळंन्यास) करण्याचा धार्मिक विधि केला. या प्रसंगी सुलतान मुहम्मदशाह, मोकासदार असलेल्या मुस्तफाखानाचा मुलगा असदखान व ठाणेदार वेंकटाद्रि यानी (देवळाची व्यवस्था पाहण्यासाठी) नरसिदेव नावाच्या इसमाला लावगन या गावातील एक आगर (बहुधा नारळाचे असावे) व एक शेत, तसेच साटवली या गावातील एक शेत आणि सहा रुपये, अशी वृत्ती नेमून दिली. गिरमाजी वेंकटाद्रि याला बंदरनवीसीचा हक्क मिरासीने देण्यात आला. या प्रसंगी हरी बाबजी, नरसो पिलदेव व विसो केशव हे जुने पुरातन देसाई, नारो तिमाजी व हणमाजी महादेव हे कुलकर्णी, धारसेटी हा व्यापारी आणि विट सोवनी हा परीक्षक§ हे साक्षीदार म्हणून उपस्थित होते. श्रीविठ्ठलाचे देऊळ बांधले गजसेटी श्रीपति गुजर या व्यापाऱ्याने, तर देवळाला वृत्ति नेमून देण्यात आल्याबद्दलचा ताम्रपट कोरला अतसेट कारेकर या सोनाराचा मुलगा साबसेट याने.*

ताम्रपटातील मजकुराविषयी विवेचन करण्यापूर्वी, त्याची विश्वसनीयता पारखून घेणे आवश्यक आहे. ताम्रपट जितके जुने तितके त्यांच्या विश्वसनीयतेचे प्रमाण अधिक, तर ते जितके अलीकडच्या काळातील तितकी त्यांची विश्वासार्हता कमी, असा एक सर्वसाधारण नियम आहे. साटवली गावचा ताम्रपट १७ व्या शतकातील आहे. या शतकात कागद विपुल प्रमाणात उपलब्ध असल्याने, ताम्रपट कोरून ठेवण्याचे प्रयोजन काय असे वाटून त्याच्याबद्दल शंका निर्माण होते. या शंकेला बळकटी आणणारे आणखी एक कारण आहे. सुलतानी बंदरातील श्री. विठ्ठलाचे देऊळ बांधण्यास सुरुवात झाल्याचा काळ शके १५६१, प्रमाथी संवत्सर, कार्तिक शु. ५, गुरुवार, मूळ नक्षत्र असा ताम्रपटात दिलेला आहे. खरे जंत्रीप्रमाणे पाहता, शके १५६१ तील संवत्सराचे नाव प्रमाथी होते, परंतु त्या वर्षीच्या कार्तिक शु. ५ ला गुरुवार नसून सोमवार होता. तसेच त्या दिवशीचे नक्षत्र मूळ नसून पूर्वाषाढा होते हे पिल्ले जंत्रीवरून कळून येते. हिंदू धर्मशास्त्र व ज्योतिषशास्त्र यांच्यानुसार, मूळ नक्षत्र हे कोणत्याही धार्मिक कार्यासाठी अशुभ मानण्यात येते. तेव्हा या नक्षत्राच्या मुहूर्तावर सुलतानी बंदरातील श्रीविठ्ठलाच्या मंदिराच्या बांधकामाला आरंभ होणे शक्य वाटत नाही. तथापि थोडासा विचार केला तर असे दिसून येईल की देवळाच्या बांधणीचा आरंभ मूळ नक्षत्रावर नसून पूर्वाषाढा नक्षत्रावर झाला. पण देवळाच्या बांधणीस सुरुवात झाल्यानंतर जवळजवळ सहासात महिन्यांनी ताम्रपट कोरला गेला. एवढ्या कालावधीचे अंतर पडल्याने ताम्र-

---

§ या शब्दाचा अर्थ बहुधा, बंदरातील आयात-निर्यात मालावर देखरेख ठेवणारा असा असावा.

* ताम्रपटातील मूळ मजकूर प्रस्तुत लेखाच्या शेवटी जोडला आहे.

पट कोरणाऱ्याच्या हातून वार व नक्षत्र यांची नोंद करताना गफलत झाली असावी. एवढी गफलत सोडल्यास इतर बाबतीत ताम्रपटाबद्दल संशय घेण्यास जागा नाही.

श्रीविठ्ठलाचे देऊळ पूर्ण झाल्यावर त्यावर कळस बसवून त्याचे उद्घाटन करण्याचा जो दिवस ताम्रपटात दिलेला आहे तो शक, संवत्सराचे नाव, तिथी, वार व नक्षत्र या सर्व दृष्टींनी बरोबर आहे. खेरीज, बुधवार व त्यात एकादशी या दुग्धशर्करा योगापेक्षा अधिक चांगला मुहूर्त श्री विठ्ठलाच्या दृष्टीने दुसरा कोणता असू शकणार ? ताम्रपट कळंन्यास विधीनंतर थोड्याच दिवसात कोरला गेल्याने, त्या विधीच्या काळाचा सर्व तपशील त्यामध्ये अचूक नोंदला गेला असावा.

केवळ कळंन्यास विधीच्या तारखेच्या अचूकपणावरून नव्हे, तर ताम्रपटाच्या मजकुरातील अंतर्गत पुराव्यावरूनही त्याची विश्वसनीयता सिद्ध करता येते. आधुनिक काळात आपण शकाचा उल्लेख 'शके' या शब्दाने करतो. जुनी ऐतिहासिक कागदपत्रे, ताम्रपट, शिलालेख इत्यादी साधनात मात्र शकाचा उल्लेख नेहमी 'शक' या शब्दानेच केला जातो. प्रस्तुतच्या ताम्रपटात 'शक' हा शब्द दोन ठिकाणी अचूकपणे वापरलेला आहे. त्याचप्रमाणे ताम्रपटातील सुलतान मुहम्मदशाह याच्याबद्दलचा उल्लेख दख्खनच्या राजकीय इतिहासाच्या दृष्टीने योग्य आहे. शके १५६१-६२ मध्ये, म्हणजे इ. स. १६३९–४० त, विजापूरला दुसरा मुहम्मद आदिलशाह राज्य करीत होता. त्याचे राज्य कोकणातील काही प्रदेशावर होते व त्यात रत्नागिरी जिल्ह्याचा काही भाग मोडत होता, हे त्याच्या काळच्या उपलब्ध असलेल्या अनेक पहिल्या दर्जाच्या अस्सल मराठी व फार्सी साधनांवरून सिद्ध झालेले आहे. ताम्रपटात ज्या लावगन व साटवली गावांचा उल्लेख आलेला आहेत ती गावे सध्या रत्नागिरी जिल्हयातील लांजे तालुक्यात येतात. साटवली हे गाव लावगन या गावाच्या आग्नेयेस सुमारे दहा किलोमीटर-वर आहे. लावगन हे गाव रत्नागिरीच्या समुद्रकिनाऱ्यापासून सुमारे दहा कि. मीटरवर तर साटवली सुमारे वीस कि. मीटरवर आहे. सरकारच्या शिरगणती अहवालावरून (Census Reports) तसेच महाराष्ट्राच्या ग्रामसूचीवरून असे दिसून येते की सबंध महाराष्ट्रात लावगन व साटवली या नावाचे प्रत्येकी एकच गाव आहे आणि तेही रत्नागिरी जिल्ह्यातच. त्यामुळे या दोन गावांचा ताम्रपटातील उल्लेख भौगोलिकदृष्ट्या बरोबर व महत्त्वाचा वाटतो. ताम्रपट साटवली गावात सापडला म्हणूनही त्याच्या विश्वसनीयतेत भर पडते. भाषेच्या दृष्टीने पाहिल्यास, ताम्रपटातील भाषा १७ व्या शतकातील मराठी साधनात आढळून येणाऱ्या भाषेसारखीच वाटते. उदा. मोकासाई, बंदरनिसी (बंदरनवीसीसाठी), वृति, विट (विठ्ठल शब्दाचे प्राकृत रूप) यांसारखे शब्द, तसेच सबसेट (सांबसेटसाठी) बिन अतसेट (अंतुसेटसाठी) यासारखी शब्दरचना आदिलशाही काळातील वाटते. पाध्ये, गुर्जर, नवाथे, सोवनी इत्यादी कऱ्हाडे ब्राह्मणांचा

ताम्रपटातील उल्लेख भौगोलिकदृष्टचा सुसंगत आहे. कारण आजही राजापूर तालुका व त्याला लागून असलेल्या लांजे तालुक्यात कऱ्हाडे ब्राह्मणांची वस्ती मोठ्या प्रमाणावर आढळून येते. सोनार जातीतील कारेकर या आडनावाची ताम्रपटातील नोंदही योग्यच आहे. आजही दैवज्ञ सोनार जातीत कारेकर या आडनावाचे लोक आढळून येतात.

पूर्वीच्या काळी राजा किंवा बादशाह याच्याकडून वतने, इनामे वगैरे उपटण्यासाठी राजरोसपणे खोटे ताम्रपट तयार केले जात असत. प्रस्तुत ताम्रपटाच्या बाबतीत ही गोष्ट शक्य वाटत नाही. [कारण, त्यात श्रीविठ्ठलाच्या देवळाला जी वृत्ती नेमून दिल्याचा उल्लेख आहे ती एखाद्या व्यक्तीशी वा कुटुंबाशी संबंधित नाही. दुसऱ्या मुहम्मद आदिलशहाने ती सबंध गावाकरिता म्हणून दिलेली आहे. तिच्यामागील आशय खाजगी नसून सामाजिक आहे. या गोष्टीचा तसेच वरील सर्व बाबींचा विचार केला तर ताम्रपटाची विश्वसनीयता संशयातीत वाटते.

या ताम्रपटात दुसऱ्या मुहम्मद आदिलशहाने श्रीपांडुरंगाच्या देवळात जी वृत्ती नेमून दिल्याचे लिहिले आहे तिचे आगळे वैशिष्टच नजरेत भरते. सर्वसाधारणपणे मुसलमान राज्यकर्त्यांनी हिंदूंच्या देवालयांना ज्या वृत्ती किंवा देणग्या दिलेल्या आढळतात त्या सनदांच्या स्वरूपात, म्हणजे कागदांवर शिक्केमोर्तबांनिशी मजकूर लिहून. आदिलशाही काळातील देणग्याही याला अपवाद नाहीत. पण सुलतानी बंदरातील श्रीविठ्ठलाच्या देवळाला दुसऱ्या मुहम्मद आदिलशहाने जी वृत्ति नेमून दिली ती सनद लिहून नव्हे; तो स्वत:, मोकासदार मुस्तफाखानाचा मुलगा आसदखान (हा बहुधा विजापुरी कोकण सुभ्यात ल महत्त्वाचा अधिकारी असावा) व रत्नागिरी भागातील स्थानिक अधिकारी ठाणेदार वेंकटाद्रि यांच्यासह देवळाच्या कळस उभारणीच्या (कळंन्यासाच्या) धामिक समारंभाला उपस्थित राहिला, आणि त्या वेळी त्याने देवळाची व्यवस्था पाहण्यासाठी नरसिदेव नावाच्या गृहस्थाला लावगन व साटवली या आगराची व शेतांची वृत्ती दिल्याचे तोंडी जाहीर केले असले पाहिजे. असे म्हणण्याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे, त्या वेळी मुहम्मद आदिलशहाजवळ सनद लिहून देण्याचे लेखी साहित्य असण्याची शक्यता फारच थोडी होती. दुसरे म्हणजे, जर त्याने कागदावर सनद लिहून दिली असती तर प्रस्तुत ताम्रपट कोरण्याचा प्रपंच करण्याचे काहीच कारण नव्हते. हा ताम्रपट म्हणजे आदिलशहाच्या हातची अधिकृत सनद नव्हे. सनदेला कायदेशीर स्वरूप असते तसे ते या ताम्रपटाला नाही. ताम्रपटात 'वृत्ति दिली' असे म्हटले आहे त्याचा अर्थ, दुसऱ्या मुहम्मद आदिलशहाने वृत्ती दिल्याचे जे तोंडी जाहीर केले, त्याची ताम्रपटाच्या रूपात फक्त लेखी नोंद नंतरच्या काळात करून ठेवण्यात आली. ती वृत्ती नरसिदेवाच्या नावाने प्रत्यक्षात मिळण्यास

आदिलशहाच्या सनदेची जरूरी होती. प्रत्यक्षात पुढे अशी सनद आदिलशहाने दिली की नाही हे सांगता येत नाही.

दुसरा मुहम्मद आदिलशहा स्वतः होऊन कळंन्यास समारंभाला उपस्थित राहणे शक्य नव्हते. यावरून असे दिसते की सुलतानी बंदरातील प्रतिष्ठित गावकऱ्यांच्या आमंत्रणावरून तो त्या समारंभाला गेला असावा. आजच्या काळात लोक निरनिराळ्या उद्‌घाटनसमारंभांसाठी मंत्र्यांना व बड्या सरकारी अधिकाऱ्यांना बोलावतात. बऱ्याच वेळा त्यामागील उद्देश मोठमोठ्या देणग्या मिळविण्याचा किंवा उपटण्याचा असतो. मंत्रीसुद्धा काही वेळा उदारपणे देणग्या वा सरकारी मदत देण्याचे जाहीर आश्वासन देतात. पण नंतर त्याप्रमाणे सरकारी कार्यवाही होतेच असे नाही. असाच काहीसा प्रकार सुलतान बंदराच्या बाबतीत घडला असावा. सुलतान बंदरातील गजसेटी श्रीपति गुजर नावाच्या व्यापाऱ्याने पांडुरंगाचे नवीन देऊळ बांधले. हे देऊळ सर्व गावाकरिता असल्याने त्याच्या व्यवस्थेकरिता सरकारातून काही मदत मिळणे आवश्यक होते. तेव्हा सुलतान बंदरातील प्रतिष्ठित लोकांनी मोकासदार मुस्तफाखान याचा मुलगा असदखान व ठाणेदार वेंकटाद्रि यांच्यामार्फत दुसऱ्या मुहम्मद आदिलशहाकडे संधान बांधून, त्याला कळंन्यास समारंभासाठी बोलावून आणून त्याच्याकडून श्रीविठ्ठलाच्या देवालयाच्या व्यवस्थेसाठी नरसिदेवाला वृत्ती दिल्याचे जाहीर आश्वासन घेतले असावे. अर्थात या सर्व व्यवहारात ठाणेदार वेंकटाद्रि याचे हितसंबंध गुंतलेले असण्याची दाट शक्यता आहे. कारण त्याला बंदरनवीसीचा मोकासा हक्क आदिलशहाने दिल्याचे ताम्रपटात लिहिलेले आहे. कुलकर्णी म्हणजे ज्याप्रमाणे गावचे हिशेब ठेवणारा अधिकारी, त्याप्रमाणेच बंदराचे हिशेब ठेवणारा अधिकारी तो बंदरनवीस. बंदरनवीसीच्या कामातच, श्रीविठ्ठलाच्या देवालयाच्या आयव्ययाचा हिशेब ठेवण्याचे कामही कदाचित् त्याच्यावर सोपवले गेले असण्याचा संभव आहे. मात्र ताम्रपटात तसा स्पष्ट उल्लेख नाही.

दुसऱ्या मुहम्मद आदिलशहाने पांडुरंगाच्या देवळाला वृत्ती दिल्याचे जाहीर केले खरे, पण तेवढ्याने भागण्यासारखे नव्हते. दिलेल्या आश्वासनानुसार त्याच्याकडून वृत्तीच्या नेमणुकीची अधिकृत सनद ताम्रपटात उल्लेखिलेल्या सरकारी अधिकाऱ्यांमार्फत येणे आवश्यक होते. तशी ती येण्याची खात्री काय? बरे, आदिलशहाने ती दिली तरी ती सुलतान बंदरात येऊन पोहोचायला काही काळ लागणे अपरिहार्य होते. दरम्यानच्या काळात आदिलशहाच्या आश्वासनाची काही तरी नोंद ठेवणे जरूरीचे आहे असे वाटून सुलतान बंदरातील प्रतिष्ठितांनी अतसेट कारेकर या सोनाराचा मुलगा साबसेट याच्याकडून प्रस्तुत ताम्रपट कोरून घेतला असावा. ताम्रपटाबरोबर आदिलशहाची सनद उपलब्ध असती तर या बाबतीत ठाम विधान करणे सोपे झाले असते. कळंन्यासाच्या समारंभाच्या वेळी ज्या ज्या

गोष्टी घडल्या त्याचे साक्षीदार म्हणून बंदरातील जुन्या प्रतिष्ठित अधिकाऱ्यांची व नागरिकांची जी नावे दिलेली आहेत त्यात देसाई, कुलकर्णी, व्यापारी, परीक्षक इत्यादी वेगवेगळ्या थरांतील लोकांचा समावेश आहे.

ताम्रपटात ज्या 'सुलतानि' बंदराचा उल्लेख आलेला आहे ते नेमके कोणते बंदर हे सांगता येत नाही. सुलतानी या शब्दाचा अर्थ सुलतानाचे किंवा सुलतानाच्या राज्यातील असा घेतला तर तो समाधानकारक ठरू शकत नाही. सुलतानाच्या राज्यात अनेक बंदरे होती त्यातले नेमके कोणते बंदर धरायचे? बरे, बंदराचे मूळ हिंदू नाव न देता नुसता सुलतानी बंदर असा मोघम उल्लेख ताम्रपट कोरणाऱ्याला करण्याचे कारण काय? ताम्रपट कोरणाऱ्याच्या अशुद्ध मराठीमुळे त्याने 'सुलतानि बंदर' असे शब्द कोरले. वास्तविक त्याऐवजी 'सुलतान बंदरी' असे पाहिजे. मुस्लिम राज्यकर्त्यांच्या प्रथेस अनुसरून आदिलशाही राज्यकर्त्यांनीही काही गावांची व बंदरांची मूळ हिंदू नावे बदलून त्यांचे इस्लामीकरण केल्याची उदाहरणे आढळून येतात. आदिलशाही काळातील मराठी व फार्सी कागदपत्रांतून दाभोळ बंदरासाठी मुस्तफाबाद, चेऊल बंदरासाठी मूर्तजाबाद, राजापूर बंदरासाठी इस्लाम तर सिघोट बंदरासाठी मुहम्मदाबाद अशी नावे दिलेली आढळून येतात. कोकणातील एका बंदराला तर शाह बंदर असे नाव दिलेले आढळते. त्यावरून अशी शक्यता वाटते की दुसरा मुहम्मद किंवा त्यांच्या आधीच्या एखाद्या आदिलशहाने विजापुरी कोकणातील एखाद्या बंदराचे हिंदू नाव बदलून सुलतान बंदर असे ठेवले असावे. मात्र कोणत्या बंदराचे हे नाव ठेवले असावे ते ऐतिहासिक पुराव्याअभावी ठामपणे सांगता येत नाही. एक गोष्ट निश्चित की, हे बंदर लावगन व साटवली या गावांपासून जवळ असावे. रत्नागिरी बंदर असण्याची शक्यताही अगदीच नाकारता येणार नाही.

हा साटवलीचा ताम्रपट खाजगी स्वरूपाचा नाही. त्यामुळे त्यातून जो सामाजिक आशय व्यक्त झालेला आहे तो महत्त्वाचा आहे. त्या दृष्टीने ताम्रपटातील क्र. १० ते १४ या ओळी उल्लेखनीय आहेत. 'जो पाळील त्याचे धर्मदेवालय,' म्हणजे जो या देवळाचे रक्षण व जतन करील त्या प्रत्येकाचे हे देवालय आहे, असे १० व्या ओळीत सांगितलेले आहे. पुढील ११ ते १४ या ओळींत, गावातील पुरातन देसाई, कुलकर्णी, व्यापारी व परीक्षक यांची जी नावे दिलेली आहेत ती केवळ दुसऱ्या मुहम्मद आदिलशहाने जाहीर केलेल्या वृत्तीचे साक्षीदार म्हणून नसून, श्रीविठ्ठलाच्या देवळाचे रक्षण, जतन व देखभाल यांची सामूहिक जबाबदारीही त्यांच्यावर टाकण्यात आलेली आहे.

इसवी सनाच्या १३ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंतच्या काळात श्रीविठ्ठल व वारकरी पंथ यांचा प्रभाव महाराष्ट्राच्या देशावरील भागात वाढत्या प्रमाणावर होता. त्या मानाने या काळात कोकणात वारकरी पंथाचा फारसा शिर-

काव झालेला नव्हता, मग त्याचे कारण कोकणची भौगोलिक परिस्थिती असो वा अन्य काही असो. ताम्रपटावरून असे दिसते की १७ व्या शतकामध्ये श्रीविठ्ठलाचा प्रभाव कोकणामध्येही हळूहळू पडण्यास सुरुवात झाली होती. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने ही महत्त्वाची घडामोड होती. ताम्रपटात उल्लेखिले गेलेले वेंकटाद्रि व नरसिदेव हे दोघे कानडी गृहस्थ असतील तर सुलतान बंदरी पांडुरंगाचे देऊळ उभारण्यात त्यांचा पुढाकार असणे अशक्य नाही.

सुलतान बंदरातील गावकऱ्यांनी दिलेल्या आमंत्रणास प्रतिसाद देऊन दुसरा मुहम्मद आदिलशाह श्रीविठ्ठलाच्या देवळाच्या कळंन्यास समारंभाला उपस्थित का राहिला याची दोन कारणे संभवतात. पहिले कारण आर्थिक स्वरूपाचे आहे. देऊळ गजिसेटी श्रीपति गुजर या व्यापाऱ्याने बांधले. प्राचीन काळापासून असे दिसते की, व्यापारी वर्ग हा आपल्या ऐहिक व आर्थिक समृद्धीसाठी राजसत्तेवर अवलंबून असतो, तर राजसत्ता आर्थिक मदतीसाठी व्यापारीवर्गावर विसंबून राहते. त्यामुळे दोन्ही वर्ग एकमेकांना खूष ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न करीत असत. राजसत्ता व्यापाऱ्यांना खूष ठेवण्याचा कसा प्रयत्न करी याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुस्लिम राज्यकर्त्यांनी जैनांच्या देवालयांना देणग्या वा वृत्ती नेमून दिल्याचे जुन्या ताम्रपटांतून व शिलालेखांतून आढळून येते. त्यामुळे गजसेटी श्रीपती गुजर याला व स्थानिक व्यापारीवर्गाला खूष ठेवण्यासाठी दुसरा मुहम्मद आदिलशाह कळंन्यास विधीला हजर राहणे सहज शक्य आहे.

कळंन्यास विधीला उपस्थित राहण्यात मुहम्मद आदिलशहाचा दुसरा हेतू राजकीय असावा. विजापूरच्या आदिलशहांनी निरनिराळ्या प्रसंगी हिंदू देवळांना वृत्ती, देणग्या दिल्याचे शिवचरित्रसाहित्य, ऐतिहासिक फार्सी साहित्य वगैरे ग्रंथांतून तसेच इतरत्र प्रसिद्ध झालेल्या मराठी व फार्सी कागदपत्रांवरून दिसून येते. तसेच आदिलशाही राज्यकर्त्यांनी महाराष्ट्रातील ब्राह्मण व मराठे सरदारांना अनेक प्रकारची वतने, इनामे दिल्याची गोष्ट प्रसिद्ध आहे. या संदर्भात कळंन्यासाच्या विधीला हजर राहण्याची मुहम्मद आदिलशहाची कृती लक्षात घेतली तर असे निश्चितपणे म्हणता येईल की दिल्लीच्या सुलतानांशी तुलना करता, आदिलशाही राज्यकर्ते धार्मिक बाबतीत बरेच सहिष्णु होते. मात्र ही सहिष्णुता सर्वधर्मसमभावातून निर्माण झालेली नसून, राजकीय गरजेतून उत्पन्न झाली होती. विजापूरच्या दरबारात इराणी-तुराणी, स्थानिक-परदेशी मुसलमानांत वरचेवर भांडणे होत असत. याबद्दलचे उत्कृष्ट विवेचन कै. द. वि. आपटे यांनी आपल्या 'मुधोळच्या घोरपडे घराण्याचा इतिहास' या ग्रंथात केलेले आहे. दरबारातील वेगवेगळ्या मुसलमानी पक्षांत समतोल राखून आपले स्थान सुरक्षित ठेवण्यासाठी आदिलशहांना कसरत करावी लागे. त्यासाठी त्यांना मराठे सरदारांची मदत घ्यावी लागे. त्यामुळे हिंदूंना म्हणजे मराठ्यांना समाधानी ठेवणे त्यांना भाग होते. मराठ्यांना वतने

देणे, देवालयांना देणग्या देणे हा या राजकीय धोरणाचाच एक भाग होता. त्या दृष्टीने पाहिल्यास दुसरा मुहम्मद आदिलशाह श्रीविठ्ठलाच्या उद्घाटनसमारंभाला उपस्थित राहिला याचे आश्चर्य वाटावयास नको.

डेक्कन कॉलेज बुलेटिनमधील लेखात सदरहू ताम्रपट नोंदून झाल्यावर अधिकृत सनद आदिलशहाने दिली असेल असे समजून विवेचन करण्यात आलेले आहे. परंतु प्रस्तुत लेखात, हा ताम्रपट म्हणजे केवळ एक नोंद आहे असे समजल्यावर वेगळा अर्थ कसा निघतो, ते दाखविले आहे.

साटवली येथे सापडलेल्या ताम्रपटातील मजकूर

१. श्रीगणेशाय नम निर्विघ्नमस्तु स्वस्ति श्रीनृप शालिवाहान श
२. क १५६१ प्रमाथि संवछरे कार्तिक सुध पंचमि गुरुवार मुळ
३. नक्षत्र त दिनी सुलतानि बंदर आरंभ केले देव श्रीपांडुरंगस्थाप
४. ना शक १५६२ विक्रम संछर वैशाख सुध येकादसि बुधवार नक्ष
५. त्र उत्रा फालगुनि राघो पाध्ये गुर्जर वा मादेभट नवाथिये याचे हस्ते
६. कळंन्यास जाहाले ते समइ राजा सुलतान महामदशा वा मो
७. कासाई मुस्तफाखानाचे पुत्र असदखान वा ठाणदार वेंकटा
८. द्रि नरसिदेवासि वृति लावगनामध्ये आगर १ रुपाई ६ व सेत ये
९. क वा साटवलिमध्ये सेत येक यैसे यावचंद्रपर्यंत दिले असे
१०. जो पाळिल त्याचे धर्मदेवाळय वा गजिसेटि श्रीपति गुजर त्याणे बा
११. धले व बंदरनीसि गिर्माजी वेंकटाद्रिसि मीरास करून दिले वा
१२. पुरातन देसाई हरि बाबजि व नरसो पिंलदेव व विसो केशव वा
१३. कुळकर्णि नारो तिमाजि व हणमाजी महादेव व धारसेटि व
१४. परिक्षक विट सोवनि शुभं भवतु
१५. श्रीवीटळ प्रसन साबसेट बीन अतसेट कारेकर सोनार

■ ■

Summary

A copper plate grant relating to Muhammad Adil Shah II

A copper-plate of the 17th century, consisting of fifteen lines of Marathi text in Devanagari script, was obtained some years back from the village Satavali in Lanje Taluka, Ratnagiri District.

The internal evidence shows that the copper-plate is authentic. Its inscription records that on 21st October 1639, the construction of a temple of Lord Vithoba was started in

a sea-port in the Konkan region known as the Sultani Bandar. On 22nd April 1640, the kalasa (tower) of the same temple was installed by Ragho Padhye, Gurjar and Mahadeobhat Navathe. On that auspicious occasion Muhammad Adil Shah II, Mokasdar Mustafa Khan's son Asad Khan and the Thanedar by name Venkatadri granted perpetually an *agar*, (cocoanut grove) six rupees and a field in the village of Lavagan and also another field in the village of Satavali to the new temple and entrusted the grant to Narasideo. The temple was built by merchant Gajiseti Sripati Gujar. Girmaji Venkatadri was appointed Bandarnavis to keep the accounts of the port. The witnesses of the grant included old traditional Desais, the Kulkarnis, one merchant and supervisor in Sultan Bandar. Sabset, a goldsmith, was the inscriber of the grant.

The copper-plate is not the official *sanad* of Muhammad Adil Shah. Most probably he attended the religious ceremony of installation of *kalasa* on the invitation of the people of Sultan Bandar. The people invited Adil Shah because they wanted some grant from Adil Shah for maintenance of the new temple of Vithoba which was meant for all people in Sultan Bandar. Adil Shah, in order to please the local merchant class (the temple was built by a merchant) for its financial support and the Hindu subject for its political backing attended the religious function. He made an oral declartion of the grant mentioned in the copper-plate to the temple. As the grant was made orally, the people of Sultan Bandar thought it necessary to record it in some way or the other until the official sanad was obtained from Adil Shah. Therefore, they got the copper-plate inscribed by Sabset Sonar. Whether they received or not the official sanad from Adil Shah afterwards is not known. It is also difficult to identify Sultan Bandar due to lack of historical evidence.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४ : २–४, ऑक्टो. १९८५–एप्रिल १९८६

रायगडावरील काही ठिकाणांची स्थाननिश्चिती

प्र. के. घाणेकर

गरवारे कॉलेज, पुणे

शिवाजी महाराजांनी इ. १६७० च्या सुमारास राजगडावरून रायगड किल्ल्यावर राजधानी हलवली. राजगडच्या माथ्यावर अपुरी सपाटी व मर्यादित पाणीपुरवठा होता. रायगडावर मात्र विस्तृत सपाटी होती. तेथे खोदलेली अनेक टाकी व तलाव, यामुळे मुबलक पाणीही उपलब्ध होते. रायगड परिसराची दुर्गमता विचारात घेता, राज्याच्या बहुसंख्य गरजा येथील राजधानी पुरी करू शकत होती. साग्रसंगीत राजधानीसाठी आवश्यक म्हणून जवळजवळ तीनशे इमारती या किल्ल्यावर बांधल्या गेल्या.

इ. १६७४ चा राज्याभिषेक आणि १६८० साली शिवछत्रपतींचा मृत्यू या दोन घटनांमुळे भारतीय इतिहासातील घडामोडींना वेगळेच वळण लागले. शिवरायांच्या मृत्यूनंतर अवघ्या ९–१० वर्षांत इतिकदखानाने ३ नोव्हेंबर १६८९ रोजी रायगड जिंकून घेतला. इतिकदखान नंतर झुलफिकारखान बनला आणि रायगडाचा इस्लामगड झाला. या काळातच रायगडाचे राजधानी म्हणून महत्त्व संपले. पुढे औरंगजेबाचा इ. १७०७ मध्ये मृत्यू झाला, त्यावेळी राजा शिवसिंग हा पाचाड व रायगडचा प्रमुख मुघल अधिकारी म्हणून काम पहात होता. परंतु उत्तरेकडे परतणाऱ्या इतर मुघल अधिकाऱ्यांप्रमाणेच राजा शिवसिंगही निघाला. त्यावेळी त्याने सिद्दी याकूतखान या जंजिरेकर नबाबाकडे पाचाड व रायगडचा ताबा दिला. त्याने सिद्दी जोहार याला रायगडचा किल्लेदार केले. इ. १७०७ पासून २ जून १७३३ पर्यंत हा किल्ला जंजिरेकर सिद्दींच्याच ताब्यात होता. महाराष्ट्रातील इतर अनेक किल्ल्याप्रमाणेच हा एक किल्ला इतकेच त्याचे महत्त्व राहिले.

मराठी अमदानीप्रमाणे मुघल व सिद्दींच्या कालखंडात रायगडावर फार मोठी बांधकामे झाल्याची नोंद मिळत नाही. होत्या त्याच वास्तू थोडीफार डागडुजी किंवा मामुली फेरफार करून वापरल्या गेल्या. ज्या कारणासाठी त्या वास्तू बांधल्या गेल्या, त्याच कारणांसाठी त्या वापरल्या जात होत्या असे दिसत नाही. राजधानी म्हणून या गडाचे महत्त्व संपले होते.

शाहूच्या सुटकेनंतर रायगडाचा ताबा मराठ्यांकडे आला. प्रथम प्रतिनिधी, मग पोतनीस व नंतर पेशव्यांकडे ह्या किल्ल्याची व्यवस्था होती. याही काळात छत्रपतींचे वास्तव्य रायगडावर झाले नाही. इतर अनेक किल्ल्यांप्रमाणेच रायगड हा एक किल्ला राहिला. या काळात देखील, शिवकालात ज्या वास्तू ज्यासाठी बांधल्या गेल्या त्याच कारणासाठी त्या उपयोगात आणल्या जात होत्या असे वाटत नाही. थोडक्यात, शिवकालानंतर अवघ्या दहा वर्षांत रायगडावरील वास्तूंचे उपयोग बदलले. त्यामुळे त्यांची मूळची नावे जशीच्या तशी राहिली असतीलच असे नाही.

१० मे १८१८ रोजी कर्नल प्रॉथरने हा किल्ला जिंकला. इंग्रजांच्या काळात या किल्ल्याचा ताबा जंगलखात्याकडे गेला. १८१८ ते १८८३ या ६५ वर्षांच्या प्रदीर्घ काळात फारसे कोणी रायगडावर फिरकले नाही. त्यामुळे देखील वास्तूंची मूळ नावे, त्यांचे उपयोग, या गोष्टींचे सामाजिक विस्मरण घडले.

इ. १८८३ नंतर जेम्स डग्लस, सर रिचर्ड टेंपल (मुंबईचे गव्हर्नर), रेव्हेन्यू कमिशनर क्रॉफर्ड, कॅप्टन पिट (१८८५), गोविंद बाबाजी जोशी (१८८७), लोकमान्य टिळक (१८९५) आदी मंडळी रायगडावर गेली. रायगडाकडे लोकांचे त्यामुळेच लक्ष वेधले गेले. या काळात तेथे जाणाऱ्या लोकांना पाचाडचा मुजावर सैद महमद किंवा वाडी (रायगडवाडी) तेथील श्रीधर भगवानशेट सोनार गड दाखवायला जात असत. श्रीधरशेट रायगडाबद्दल व शिवाजीमहाराजांबद्दल असंबद्ध दंतकथा सांगत असे (शां. वि. आवळसकर, रायगडची जीवनकथा, पान १९३), रायगडावर जाणाऱ्या प्रवाशांना माहिती मिळण्याचे हेच काय ते प्रमुख साधन होते. बहुधा यावरच थोडेफार अवलंबून राहून जेम्स डग्लसचे बुक ऑफ बॉम्बे (१८८३) जेम्स कॅम्पबेलने संपादिलेले कुलाबा गॅझेटियर, गोविंद बाबाजी जोशी लिखित रायगड किल्ल्याचे वर्णन (१८८३), गोविंद गोपाळ टिपणीस लिखित रायगडाची माहिती (१८९६) अशी काही पुस्तके या काळात लिहिली गेली. त्यातील स्थळनिश्चितीच आपण आजवर प्रमाण मानीत आलो आहोत. त्यांनी दिलेली ठिकाणांची नावे आणि त्यांची वर्णने ही अस्सल ऐतिहासिक साधनांचा वापर करून पक्की केली गेली आहेतच असे वाटत नाही. म्हणजे रायगडावरील स्थाननिश्चिती व नावे ठिसूळ पायावर उभी आहेत. केवळ परिसरातील लोकांनी सांगितलेल्या हकीगती व त्यांनी सांगितलेली नावे प्रमाण मानायची तर आजमितीस देखील पाचाडचे मुजावर व वाडीचे सोनार यांचे वंशज किंवा अन्य मंडळीना रायगडवरील ठिकाणांची किती माहिती आहे, त्यांच्या सांगण्यात किती फरक पडतो हेही ध्यानी घ्यावे लागेल.

रायगडावरील जगदीश्वराचे उल्लेख "श्रीवाडेश्वर" असे येतात. तरीही आपण आता त्याला जगदीश्वर म्हणूनच संबोधतो. कुशावर्त तलावाच्या काठाजवळील महादेवाचा कुशावर्त म्हणून उल्लेख केला जातो. तो वस्तुतः श्रीरामेश्वर

आहे हेही कागदपत्रांवरून आपल्याला कळते.

रायगडावरील राणीवसा, बाजारपेठ, कैदखाना, खलबतखाना अशा अनेक जागा, त्यांची नावे व उपयोगाची यथार्थता यांचा विचार केला तर त्या गोंधळात पाडतात. त्यापैकी राणीवसा याबद्दल आपण विचार करणार आहोत.

राणीवसा :

रायगडावरील राण्यांची निवासस्थाने या अर्थाने राणीवसा हा शब्द वापरला जातो. पालखी दरवाज्यातून वर गेले की उजव्या हातास लागणाऱ्या सहा वाड्यांचा निर्देश राणीवसा म्हणून केला जातो. परंतु या जागी राण्यांचे वास्तव्य असेल का याचा विचार करू गेलो तर बऱ्याच अडचणी येतात. त्यातून उद्‌भवणाऱ्या शंकांना उत्तरे देता येत नाहीत. या शंका अशा :

(१) राजा व त्याच्या राण्या अशी वेगवेगळी निवासव्यवस्था निश्चितपणे होती का? तसा प्रघात त्याकाळी होता का? आधीची राजधानी असलेल्या राजगडावर तसे काही आढळते का?

(२) शिवाजी महाराजांना आठ राण्या होत्या. सईबाईचा मृत्यू राजगडावरच १६५९ साली झाला. सोयराबाई (विवाह १६५० पूर्वी, मृत्यू १६८१ मध्ये), पुतळाबाई (विवाह १६५३, सती गेल्या १६८० मध्ये), सकवारबाई (लग्न १६५७, या १६८९ नंतर औरगजेबाच्या कैदेत होत्या), काशीबाई (लग्न ९ एप्रिल १६५७, मृत्यू १६७४, राज्याभिषेकाचे थोडा आधी); सगुणाबाई (लग्न १६४१) आणि गुणवंताबाई (लग्न १५ एप्रिल १६५७) या राण्यांच्या मृत्यूबाबत काहीही नोंद मिळत नाही. म्हणजे रायगडावर राजकुटुंब हलल्यानंतर नेमक्या किती राण्या हयात होत्या हे कळत नाही. त्यावेळी संभाजीराजांचाही विवाह झालेला होता, याचाही विचार करायला हवा.

(३) राजा व त्याच्या राण्या यांना लागणारा एकांत त्या दोन ठिकाणी रहाण्यामुळे नष्ट होतो. कारण शिवनिवास आणि राणीवसा यामध्ये एक खंदक व शिबंदीच्या घरांची ओळ आहे.

(४) येथील सहा वास्तूंपैकी दोन पूर्ण विभक्त आणि चार एकमेकींना जोडलेल्या अशी रचना कशासाठी? याचे समर्पक उत्तर मिळत नाही.

(५) पालखी दरवाज्यातून आत शिरल्यावर पहिल्या चार महालांना ८-८ संडास (त्यापैकी ४ शौचकुपांवर छत व बाहेरचे ४ शौचकूप उघडे) तर शेवटच्या दोन महालांना ४–४ च संडास आहेत. असे का?

(६) या संडासांची रचना मूळ बांधकामाबरोबर झालेली नाही, दोन टप्प्यांत बहुधा आवश्यकतेप्रमाणे त्यांची रचना झाली असावी असे तेथील बांधकामावरून दिसून येते.

(७) पहिल्या महालात एकच जोते तर उरलेल्या पाच महालांमध्ये दोन दोन जोती हे का असावे ?

(८) राणीवशाभोवतीच्या ६–८ मीटर / २०–२५ फूट उंचीच्या अखंड भिंतीमुळे या ठिकाणाचे स्वरूप कैदखान्यासारखे वाटते.

(९) राण्यांसारख्या महत्त्वाच्या व्यक्तींना बाहेर डोकावून सुंदर दृश्ये पाहणे, मोकळी हवेशीर जागा असणे या गोष्टी उपलब्ध नाहीत. मागील बाजूच्या खिडकी-वजा झरोक्यांतून डोकावले तर सुंदर दृश्य बाजूलाच राहो पण संडासांची दुर्गंधी मात्र येऊ शकेल.

(१०) या कथित राणी महालांमध्ये अंघोळीच्या जागा, साधे हात धुतलेले पाणी बाहेर जाण्याच्या जागा, स्वयंपाकाची जागा नाहीत.

(११) येथील जोतीही खराब दगडांची आहेत; छान सुंदर ताशीव दगडांची नाहीत.

(१२) खास हवा खाण्यासाठी बांधलेल्या स्तंभांकडे जाण्यात बऱ्याच कट-कटी उद्‌भवतात.

राणीवशाची संभाव्य जागा

सध्या राणीवसा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जागी राण्यांचे महाल असावेत हे मानण्यामध्ये अशा अनंत अडचणी आहेत. मग त्यांची रहाण्याची जागा कोठे असावी ? याचाही विचार करणे आवश्यक ठरते.

सिंहासनाची मागील बाजू ते शिवरायनिवास यामध्ये असणाऱ्या दोन लांब-लचक-रुंद-हवेशीर जोत्यांवर साऱ्या राजकुटुंबाचे वास्तव्य असावे. कारण––

(१) या ठिकाणाला फडाची (मंत्री व कारकुनांची कार्यालये) जागा मानली जाते. तेथे सतत असणारी वर्दळ, माणसांचा वावर यामुळे होणारा आवाज, गडबड, गोंधळ यांचा त्रास व त्या अनुषंगाने येणारी असुरक्षितता यांचा विचार करता येथे फड असणे शक्य नाही.

(२) या चौथऱ्यांना लागूनच ६–८ छोट्या न्हाणीच्या दगडांची सोय, पाणी वाहून जाण्यासाठी असणारे लांब गटार, या खुणा रहाण्याच्या जागेचे प्रयोजन दाखवितात, फडाच्या जागेचे नाही.

(३) याच वास्तूला जोडून गंगासागराच्या दिशेला एक मोठा पाटा व त्या शेजारी स्वयंपाकघराला लागून असावी अशी मोरी बांधलेली आढळते. याचाही फडाशी संबंध नाही.

(४) या वास्तूंच्या दक्षिण व उत्तर तटांमध्ये बाहेरील सुंदर दृश्य दिसणारे व मोकळी हवा आत आणणारे झरोके किंवा खिडक्या रांगेने बांधल्या आहेत.

अशी सोय फडावरच्या कारकुनांसाठी व कामाला येणाऱ्यांसाठी असावी अन् राणीवशात नसावी हे मनाला पटत नाही.

(५) येथे वावरणाऱ्या लोकांना वेगळ्या शौचकूपांची व्यवस्था नाही. त्यांनीही शिवरायांसाठी बांधलेले संडास त्यांच्या रहात्या जागेवरून जाऊन वापरावेत हेही पटत नाही.

(६) परंतु या फडांच्या जागेवर राणीवशाची जागा असावी असे गृहीत धरल तर वरील सर्व शंका तर फिटतातच, पण राजा व राण्यांना एकाच तटबंदीयुक्त आवारात राहिल्यामुळे एकांत व सुरक्षितताही मिळते.

(७) येथे मोकळी जागा, भरपूर वास्तूरचना, हवेशीरपणा, सुंदर दृश्ये, पुरेशी स्वच्छता व स्नानगृहे, मुदपाकखाना ह्या गोष्टी तर उपलब्ध होतातच; पण खास हवा खाण्यासाठी बांधलेल्या मनोऱ्यांच्या जागी विनासायास हवे तेव्हा जा–ये करता येते.

येथील जोतीही अतिशय सुबकपणे घडवलेली आढळतात.

सध्याच्या राणीवशाच्या जागी काय असू शकेल ?

आता प्रश्न येतो सध्या ज्याला राणीवसा म्हणतात त्या जागी काय असू शकेल ? राजवाड्यापासून जवळ पण तट–खंदक व शिबंदीची घरटी यांनी दूर राखलेली जागा, भोवतालचा कडेकोट बंदोबस्त, येथील शौचकूपांची बरीच संख्या यांचा विचार करता येथे फडांची जागा म्हणजे मंत्र्यांची कार्यालये असावीत असे वाटते. अष्टप्रधानांपैकी धर्मशास्त्री पंडितराव व सरसेनापती यांचा सामान्य जनतेशी फारसा संबंध येत नसावा. मात्र पेशवा व सचीव यांना खास वेगळी जागा जागा उपलब्ध आहे. अर्थात यावेगळे येथे काही असू शकेल. तो प्रस्तुत विषयाशी फारसा संबंधित भाग नाही.

गडावरील ठिकाणांच्या स्थाननिश्चितीची आजच गरज निर्माण झाली आहे, कारण येथे उत्खनने केल्याने वेगाने होणाऱ्या पडझडीमुळे बऱ्याच गोष्टी नाहीशा होत आहेत. या सर्व गोष्टी आज आपल्याला पाहता येतात, पण उद्या त्या पाहता येणारही नाहीत.

रायगडावरील बाजारपेठ की नगरपेठ ? कैदखाना की धान्य कोठार ? खलबतखाना की रत्नशाळा ? याही अनेक गोष्टी अशाच आहेत. त्याबत पुन्हा केव्हातरी वेगळा विचार करावा लागेल.

■ ■

Snmmary

Identification of some historical places on Raigad

Raigad was the capital of Shivaji. Almost all buildings and

structures on this hill-fort were erected during Shivaji's period. After Sambhaji's death Raigad fell into the hands of the Mughals. For a long period the Siddis of Janjira administered the fort on behalf of the Mughal emperors of Delhi. During the period of Peshwa Bajirao I, the Marathas regained control over it. Neither under the Siddis nor under the Peshwas new buildings were constructed on Raigad, which lost its importance as a capital. After Shivaji period, there were only renovations in the buildings on Raigad. In this process there was every likelihood that their original names and uses changed to suit the changing circumstances.

The present identification of the different historical sites on Raigad have been made by relying on the accounts of Raigad given by James Douglas, Colaba Gazetteer of 1885, Govid Babaji Joshi and Govind Gopal Tipnis. Their accounts are not based on original historical records and personal observation of the places. They simply rely on here-say oral information given by an old Mujavar of the village Pachad (Raigadwadi) and Shridhar Bhagwanshet Sonar, a local guide. The original historical records do not support the identification of some of the sites on Raigad. Therefore, it is necessary to investigate the correctness of identification of these places with the aid of first hand historical evidence. Some of such sites are, royal residence for the queens (Ranivasa), Kaidkhana, Khalbatkhana, market-place etc. At persent the name Ranivasa is given to six buildings near the Palkhi Darwaja, but from on the spot observation it seems that, that place was likely to be between Simhasana and Shivrai Nivas and in the place which is supposed to be Ranivasa, the offices of the Sarkarkuns were located.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४ : २-४, ऑक्टो. १९८५-एप्रिल १८८६

मुंबई इलाख्यातील प्रांतिक परिषदा व त्यांचे कार्य

वा. रं. सुठणकर
पुणे

गेल्या शतकाच्या अखेरच्या काळात झालेला प्रांतिक परिषदेचा उदय ही राजकीयदृष्टया एक महत्त्वाची घटना होती. या परिषदेने मुंबई इलाख्यात, विशेषतः महाराष्ट्रात, राजकीय जागृती करण्याचे आणि ती सतत टिकवून ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. तिच्या या कार्याकडे दुर्लक्ष होते. म्हणून त्या परिषदेच्या कार्याचा आढावा घेण्याचे योजिले आहे.

अखिल भारतीय काँग्रेसची स्थापना इ. १८८५ साली झाली. राष्ट्रीय स्वरूपाची अखिल भारतीय संस्था अशी ही पहिलीच होती. ही काँग्रेस वर्षाच्या अखेरीस ३–४ दिवस भरत असे आणि प्रचलित राजकीय प्रश्नांवर चर्चा करून दहावीस ठराव संमत करीत असे आणि ते सरकारकडे विचारार्थ पाठवीत असे. त्याशिवाय वर्षभर तिला काही काम नसे. प्रारंभी काँग्रेसला घटना नव्हती. किंवा कार्य करणारी यंत्रणाही तिच्यापाशी नव्हती. ह्यूमसाहेब दरवर्षी काँग्रेसचे अधिवेशन सरचिटणीस या नात्याने भरविण्याचे कार्य करीत असत. मध्यंतरीच्या काळात तिचे अस्तित्वही जाणवत नसे. अद्याप तिला चळवळीचे स्वरूप आले नव्हते. पहिली कित्येक वर्षे तेच तेच कंटाळवाणे ठराव संमत करण्यात तिचा वेळ जात असे. सरकारही त्यांची फारशी दखल घेत नसे. तिला वक्तृत्वसभेचे स्वरूप आले होते, आणि ठरावावर वक्तृत्वाच्या फैरी झडत असत. काँग्रेसमध्ये सामाजिक आणि धार्मिक प्रश्नांचा जसा विचार होत नसे, तसाच प्रांतिक प्रश्नांचाही विचार होत नसे. लो. टिळकांना मुंबईचा गव्हर्नर सँडहर्स्ट याच्या जुलमी राजवटीच्या निषेधाचा ठराव मांडावयाचा होता. पण तो प्रांतिक विषय म्हणून मांडू देण्यात आला नाही. तसेच बंगालच्या फाळणीबद्दल ठराव मांडायला १९०३ च्या काँग्रेसमध्ये तो विषय बंगालपुरता मर्यादित आहे म्हणून आक्षेप घेण्यात आला होता.

लो. टिळकांनी पुढे १८९२ साली आपल्या 'मराठा' वृत्तपत्रात "वर्षातून तीनचार दिवस सभा भरवून काँग्रेसने देशाच्या राजकीय जीवनाची कुचंबणा चालू केली आहे" अशी टीका करून वर्षभर कार्य करणारी व्यापक स्वरूपाची कायमची संघटना निर्माण करावी अशी सूचना केली. तसेच अरविंदबाबू घोष यांनी 'इंदुप्रकाश' वर्तमानपत्रातून एक लेखमाला लिहून काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर आणि नेतृत्वावर टीकेची झोड उठविली होती.

काँग्रेसचे काम चालू ठेवावयाचे असेल, लोकांपर्यंत तिचा संदेश पोचवावयाचा असेल, तर काही तरी साधन, एखादी यंत्रणा उभी करणे अवश्य होते. ही उणीव पुण्याच्या सार्वजनिक सभेला तीव्रतेने जाणवली आणि त्या दृष्टीने तिने प्रांतिक परिषदेची १८८८ साली स्थापना केली. नुकतीच ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी सभेच्या चिटणीसपदाची सूत्रे हाती घेतली होती आणि न्या. रानडयांची प्रेरणा तीमागे होतीच. सार्वजनिक सभेच्या कार्याचे जाळे आणि तिचे कार्यकर्ते महाराष्ट्रात पसरले होते. सार्वजनिक काका आणि न्या. रानडे यांच्या अव्याहत प्रयत्नानी सभेला अखिल भारतात प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. या सभेने मुंबईच्या काँग्रेस पुढाऱ्यांशी घनिष्ट संबंध ठेवले होते. काँग्रेसच्या अधिवेशनाकरिता प्रतिनिधी निवडणे, अधिवेशनाकरिता विषय सुचविणे वगैरे गोष्टी परस्पर विचारविनिमयाने दोघेही ठरवीत असत. या विचारविनिमयातून प्रांतिक परिषद भरविण्याची कल्पना निघाली आणि सार्वजनिक सभेने ती प्रत्यक्षात आणली आणि पहिली मुंबई इलाखा प्रांतिक परिषद पुणे येथे १८८८ च्या नोव्हेंबर महिन्यात भरली. तिचा उद्देश आगामी काँग्रेसच्या अधिवेशनाकरिता विषय सुचविणे आणि काँग्रेसच्या कार्याची दिशा दिग्दर्शित करणे हा होता. पहिल्या पाच प्रांतिक परिषदा ओळीने दरवर्षी पुण्यातच भरल्या.

काँग्रेसमध्ये प्रांतिक प्रश्नांना वाव नसल्यामुळे सहाजिकच प्रांतिक प्रश्न, गरजा आणि गाऱ्हाणी यांना या परिषदांत महत्त्व प्राप्त झाले. त्यानुसार प्रांतिक प्रश्न हाताळण्याचे घेऊन ते सोडवून येण्याचा प्रयत्न करणे, हे काम परिषदेने अंगावर घेतले. त्याप्रमाणेच लोकांना देशपरिस्थितीची जाणीव करून देऊन त्यांच्या हक्कांबद्दल जागे करणे, काँग्रेसच्या विचारसरणीचा प्रसार करून राजकीय जागृती करीत रहाणे हेही कार्य तिने चालू ठेवले. परिषदेकरिता ठिकठिकाणचे प्रतिनिधी सभा भरवून निवडले जात. यात परिषद शक्य तितकी प्रातिनिधिक करण्याचा प्रयत्न असे.

परिषदेत मुंबई इलाख्याचे प्रश्न व गाऱ्हाणी यांच्यावर चर्चा करून तत्संबंधी ठराव केले जात. सर्व्हे सेटलमेंट, जमीन, साऱ्याची वाढ, दुष्काळ आणि दुष्काळ निवारण, मिठावरील करवाढ, जंगल व अबकारी कायद्यामुळे होणारे अन्याय, दारूच्या दुकानांच्या वाढीला आळा घालणे, प्राथमिक शिक्षणात वाढ व्हावी म्हणून प्रयत्न करणे, प्रांतिक कारभारात हिंदी लोकांना वरच्या जागा दिल्या जाव्यात अशा संबंधीचे ठराव संमत केले जात. कधी कधी तात्कालिक निकडीचेही प्रश्न घेतले जात, इ. १८८९ च्या परिषदेत त्याकाळी गाजलेल्या क्रॉफर्ड प्रकरणी सरकारने चौकशी समिती नेमल्याबद्दल सरकारचे आभार मानण्यात आले आणि ज्या मामलेदारांवर सरकारचा रोष आला होता त्याना पाठिंबा दर्शविण्यात आला. तसेच १८८१ च्या चौथ्या परिषदेत संमती वयाचा कायदा करून सरकारने लोकमत

धुडकावून लावल्याबद्दल सरकारवर ठपका ठेवण्यात आला.

पहिल्या चार परिषदा पुण्यातच भरल्यामुळे बहुतेक प्रतिनिधी महाराष्ट्रातून येत असत, बाहेरून फारच थोडे उपस्थित रहात असत. म्हणून मुंबई आणि गुजराथ भागातील लोकांना आकर्षित करण्याकरिता पाचव्या परिषदेचे अध्यक्ष म्हणून फेरोझशहा मेहता यांची योजना करण्यात आली. दिनशा वाच्छा, चिमणलाल सेटलवाड वगैरे प्रमुख गुजराथी मंडळी परिषदेला हजर राहिली. फेरोझशहांच्या अध्यक्षतेमुळे ही परिषद गाजली. त्यांनी आपल्या प्रभावी अध्यक्षीय भाषणात सामाजिक आणि राजकीय सुधारणांच्या प्रश्नांच्या बाबतीत समतोल राखावा असे प्रतिपादन केले. परिषदेसमोर महत्त्वाचा प्रश्न म्हणजे नुकत्याच केलेल्या १८९२ च्या कौन्सिल ॲक्टसाठी करावयाच्या अधिनियमांचा होता. परिषदेने कौन्सिलचे प्रतिनिधी निवडण्याचा हक्क स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपवावा अशी शिफारस केली.

या पाचव्या परिषदेतच, परिषद एकाच गावी न घेता फिरती ठेवून इलाख्याच्या निरनिराळ्या भागात भरवावी असे ठरले. त्याप्रमाणे ६ व्या परिषदेकरिता अहमदाबादची निवड करण्यात आली आणि दिनशा वाच्छा, चिमणलाल सेटलवाड आणि लो. टिळक यांची चिटणीस म्हणून निवड करण्यात आली.

लो. टिळक हा वेळपर्यंत राजकारणात पूर्णपणे उतरले होते; आणि त्यांनी प्रांतिक परिषदेचा आपल्या कार्याकरिता जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याचे ठरविले. १८८९ च्या कॉंग्रेसमध्ये टिळक आणि गोखले एकाच वेळी प्रथम हजर राहिले. १८८५ च्या स्थापनेच्या अधिवेशनाला ते हजर नव्हते. पुण्याहून गोपाळराव आगरकर, वामन शिवराम आपटे, सीताराम हरि चिपळूणकर आणि महादेव बल्लाळ नामजोशी हे पहिल्या कॉंग्रेसला उपस्थित होते. टिळकांनी १८९२ पासून प्रांतिक परिषदेत विशेष लक्ष घालायला सुरुवात केली. 'केसरीच्या' अग्रलेखातून परिषदेचे कार्य, तिचे महत्त्व आणि व्याप्ती यासंबंधी लिहायला त्यानी सुरुवात केली. दि. ११ व १८ फेब्रुवारी १८९२ च्या केसरीत त्यानी प्रांतिक परिषदेबद्दल विस्ताराने लिहिले आहे. ते म्हणतातः "आपली चळवळ सतत चालु ठेवणे, त्याला शैथिल्य येऊ न देता चळवळीचा विस्तार वाढविणे हे परिषदेचे कार्य आहे. राष्ट्रीय चळवळीच्या नमुन्यावर गावोगाव व खेड्यातही प्रयत्न सुरु झाले पाहिजेत. राष्ट्रीय सभेनंतर प्रांतिक सभा उत्पन्न करणारांचा हाच हेतू होता व म्हणूनच राष्ट्रीय परिषदेपेक्षाही प्रांतिक सभेला आम्ही अधिक महत्त्व देतो. प्रांतिक सभेपेक्षा प्रत्येक जिल्ह्यात पोटसभा स्थापन झाल्या पाहिजेत. जाहीर सभा, व्याख्याने, लेख, पुस्तके या साधनांनी लोकमत जागृत केले पाहिजे. गावोगावी सभा भरवून परिषदेकरिता मुखत्यार निवडले पाहिजेत." पुढे ते लिहितात: "राष्ट्रीय किंवा प्रांतिक सभांचे काम अगोदर तयार केलेल्या लोकमताला ठरावांचे स्वरूप देऊन योग्य रीतीने ते सरकारपुढे मांडणे एवढेच आहे." यात लोकमत आधी तयार

करण्यावर भर आहे.

कराची येथे भरलेल्या ९ व्या प्रांतिक परिषदेसंबंधी १२ मे १८९६ रोजी लिहिलेल्या अग्रलेखात ते लिहितातः "प्रांतिक परिषद ही राष्ट्रीय सभेची धाकटी बहीण आहे. त्या परिषदेमुळे लोकांच्या अडचणी व गरजा भारदस्तपणे सरकारपुढे मांडता येतात. परिषदेमुळे त्या त्या प्रांतातील लोकात उत्पन्न होणारी राजकीय जागृती ही महत्त्वाची गोष्ट आहे. जमिनीचा सारा, जंगल, मीठ, अबकारी कायदे वगैरे बाबतीत गरीब रयतेचे हक्क आहेत हे त्या रयतेस समजावून देण्याच्या उद्योगाला आपण लागले पाहिजे. रयतेची दुःखे रयतेनेच येऊन सभेत सांगितली पाहिजेत किंवा निदान ज्यांच्या दुःखाबद्दल सरकारपाशी आम्ही दाद मागतो ते लोक आपल्या सभेस तरी हजर असले पाहिजेत. सारांश, राष्ट्रीय सभा घ्या अगर प्रांतिक सभा घ्या, उत्तरोत्तर अशिक्षित अशा गरीब रयत लोकांत तिचा जितका अधिक रिघाव होईल तितका चांगला."

पुढे साताऱ्याच्या दहाव्या परिषदेच्या वेळी त्यानी लिहिलेः "प्रांतिक सभा ही राष्ट्रीय सभेची एक अत्यावश्यक पुरवणी आहे. राजकीय विषयांची चर्चा करण्याची अभिरुची प्रांतिक सभेच्या योगाने इलाख्यात जागृत होते. राष्ट्रीय सभा किंवा प्रांतिक सभा निरनिराळ्या प्रश्नांवर लोकमत काय आहे हे स्पष्टपण सरकारास कळविण्याकरिताच काढल्या आहेत." राजकीय चळवळ सातत्याने चालू ठेवण्याच्या दृष्टिकोनातून प्रांतिक परिषदांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याचा प्रयत्न टिळकांनी चालविला होता.

१८८८ पासून १९२० पर्यंत म्हणजे टिळकांच्या मृत्यूपर्यंत एकूण वीस प्रांतिक परिषदा भरल्या. पहिल्या पाच पुणे येथे भरल्या हे वर सांगितलेच आहे. परिषदांची स्थळे, वर्षे आणि अध्यक्ष यासंबंधी माहिती खाली दिली आहे :

स्थळ	वर्ष	अध्यक्ष
१ ली पुणे	१८८८	उपलब्ध नाही
२ री ,,	१८८९	लोकहितवादी
३ री ,,	१८९०	गाझी शहाबुद्दीन
४ थी ,,	१८९१	गोविंदराव लिमये
५ वी ,,	१८९२	फेरोझशहा मेहता
६ वी अहमदाबाद	१८९३	रहिमतुल्ला सयानी
७ वी मुंबई	१८९४	फाझलभाई विश्राम
८ वी बेळगाव	१८९५	दिनशा वाच्छा
९ वी कराची	१८९६	ना. ग. चंदावरकर
	३ वर्षे खंड	
१० वी सातारा	१९००	गोकुळदास पारेख

११ वी मुंबई	१९०१	तेहलीराम खेमचंद
१२ वी सोलापूर	१९०२	चिमणलाल सेटलवाड
१३ वी धारवाड	१९०३	दाजी आबाजी खरे
	पुनः ३ वर्षे खंड	
१४ वी सुरत	१९०७	भालचंद्र कृ. भाटवडेकर
१५ वी धुळे	१९०८	गणेश व्यंकटेश जोशी

१८९६ नंतर ३ वर्षे खंड पडला त्याचे कारण प्लेगची साथ आणि टिळकांचा तुरुंगवास हे असावे. पुनः १९०३ नंतर खंड पडला त्याला बंगालच्या फाळणीची चळवळ जोरात होती हे कारण असावे.

१९०७ पर्यंत परिषदेवर मवाळांचा वरचष्मा होता. परिषदांचे सर्व अध्यक्ष मवाळ पक्षाचीच मंडळी होती. त्यांचा विशेष म्हणजे हे अध्यक्ष निरनिराळ्या भागातून आणि जातीतून निवडले होते.

१९०७ ची सुरत येथील परिषद सर्वस्वी फेरोझशहा मेहता यांच्या नियंत्रणाखाली होती. या परिषदेला टिळक हजर राहू शकले नाहीत. पण त्यांचे सहकारी न. चिं. केळकर, चिंतामणराव वैद्य, दादासाहेब करंदीकर, प्रो. विजापूरकर, म. रा. बोडस वगैरे मंडळी हजर होती. मेहतांच्या दृष्टीने सुरत काँग्रेसची ही पूर्वतयारी होती. त्यामुळे त्यांनी जहाल पक्षाची डाळ शिजू द्यायची नाही असे ठरविले होते. जहाल मंडळींनी स्वदेशीचा ठराव मांडण्याचा प्रयत्न केला. पण अध्यक्षानी तो औद्योगिक परिषदेचा विषय आहे असे सांगून फेटाळून लावला. तसेच राष्ट्रीय शिक्षणावरचा ठरावही मांडू दिला नाही. १९०६ च्या काँग्रेसमध्ये स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य ही चतु:सूत्री ठरून गेली होती. त्यामानाने ही परिषद म्हणजे पुच्छप्रगती होती.

परिषदेच्या काही अधिवेशनात संघर्षाचेही प्रसंग आले. साताऱ्याच्या दहाव्या परिषदेत टिळकांना मुंबईचा गव्हर्नर सँढहर्स्ट याच्या जुलमी राजवटीबद्दल निषेधाचा ठराव मांडावयाचा होता. वाच्छा, सेटलवाड आदींनी त्याला विरोध केला. टिळकांनी १२५ प्रतिनिधींच्या सह्यांनिशी तो खुल्या अधिवेशनात मांडण्याचा आग्रह धरला. अध्यक्ष पारेख यांनी राजीनामा देण्याची धमकी दिली. शेवटी बऱ्याच वादविवादानंतर तडजोड होऊन ठराव परिषदेत न मांडता वृत्तांतात नमूद करावा असे ठरले.

इ. १९०७ च्या सुरत काँग्रेसमध्ये मवाळ आणि जहाल यांच्यात फाटाफूट होऊन जहालाना काँग्रेसबाहेर पडावे लागले. त्यानंतर प्रांतिक परिषद टिळक पक्षाच्या हातात आली. मवाळ पक्षाला प्रांतिक परिषदेत फारसे स्वारस्य वाटेनासे झाले. काँग्रेसलाही उतरती कळा लागत गेली आणि मवाळ लोकांपासून दूर होत गेले.

जिल्हा परिषदांचा उपक्रम

सुरत कांग्रेसच्या फुटीनंतर टिळकांना आपल्या राजकारणाचा पाया भक्कम करण्याची गरज भासू लागली. म्हणून ग्रामीण भागात आपली संघटना उभी करण्याच्या कामाला ते लागले. त्यांनी आपल्या माणसांना पुणे जिल्ह्यातील निरनिराळ्या भागात पाठवून तालुका सभा स्थापन केल्या. जिल्ह्यात अशा प्रकारे संघटनेचे जाळे उभारल्यानंतर त्यानी मार्च १९०८ मध्ये पुणे जिल्ह्याची प्रातिनिधिक परिषद पुण्यात भरविली. या कामीही सार्वजनिक सभेने पुढाकार घेतला होता. महर्षी अण्णासाहेब पटवर्धन परिषदेचे स्वागताध्यक्ष होते आणि गणेश व्यंकटेश जोशी हे अध्यक्ष होते. हे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ न्या. रानड्यांचे सहाध्यायी आणि अर्थशास्त्रात गोखल्याचे गुरू होते. तरी पुढे ते टिळकपक्षात सामील झाले. सार्वजनिक सभेच्या चिटणिसांनी परिषदेपूर्वी तीत यावयाच्या ठरावांना प्रसिद्धी दिली होती. विशिष्ट प्रश्नांवर अहवाल सादर करण्याकरिता काही समित्या नेमल्या होत्या. त्यांचे अहवाल परिषदेसमोर विचारार्थ ठेवण्यात आले होते. ही पुणे जिल्हा परिषद २०–२१–२२ मार्च १९०८ अशी तीन दिवस भरली होती. अध्यक्षांनी आपल्या भाषणात स्वराज्याच्या मागणीचा पुनरुच्चार करून स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या संबंधीच्या १९०६ च्या कलकत्ता कांग्रेसच्या ठरावांचा पाठपुरावा केला. पुणे जिल्ह्याचा संबंध असल्यामुळे या परिषदेला न. अ. द्रवीड, प्रा. वा. ब. पटवर्धन, गो. कृ. देवधर, ह. ना. आपटे वगैरे मवाळ पक्षाची मंडळीही हजर होती. या परिषदेत एकंदर १४ ठराव मंजूर झाले. या परिषदेत राष्ट्रीय शिक्षण आणि मद्यपानबंदी या विषयांना महत्त्व देण्यात आले. टिळकांनी मद्यपानबंदीविषयी अतिशय प्रभावी भाषण केले. त्यातूनच मद्यपानबंदीची आणि दारू दुकानावर पिकेटिंग करण्याची चळवळ निघाली. राष्ट्रीय शिक्षणासंबंधी विचार करून योजना आखण्यासाठी १२ जणांची एक समिती नेमण्यात आली. त्यात मवाळ, जहाल दोहोंचाही समावेश होता.

सुरतमध्ये फूट पडली असली तरी कांग्रेसमध्ये पुनः एकजूट व्हावी असा टिळकांचा प्रयत्न होता. त्यानुसार आगामी कांग्रेस अधिवेशनापूर्वी एकजूट व्हावी याकरिता प्रयत्न करावेत असे ठरविण्यात आले. परिषदेत शेवटच्या दिवशी एक महत्त्वाचा ठराव करण्यात आला. महाराष्ट्रात साखर कारखाने सुरू करण्याच्या दृष्टीने संशोधन करून त्याची शक्यता अजमावून अहवाल तयार करण्याकरिता अध्यक्ष ग. व्यं. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. महाराष्ट्रात साखर कारखाने काढावेत हे टिळकांच्या मनाने घेतले होते. त्याप्रमाणे 'केसरी'त लेख लिहून महाराष्ट्रात ४०–५० कारखाने स्थापन करण्याची शक्यता त्यांनी प्रदर्शित केली होती. यात टिळकांची दूरदृष्टी दिसून येते. पण मंडालेला त्यांची दीर्घ काळाकरिता कैदेत रवानगी झाल्यामुळे टिळकांचे सारे बेत ढासळले.

पुणे जिल्हा परिषद ही दोन दृष्टींनी महत्त्वाची होती. एक म्हणजे महाराष्ट्रात ग्रामीण भागात संघटना उभी करण्याचा हा पहिला प्रयत्न होता, आणि दुसरे म्हणजे पुढच्याच महिन्यात धुळे येथे जी १५ वी प्रांतिक परिषद भरावयाची होती, त्याची पूर्वतयारी टिळकांनी या जिल्हा परिषदेच्या द्वारे केली.

अशाच जिल्हा परिषदांचा उपक्रम सोलापूर, वसई वगैरे ठिकाणी १९०८ पूर्वी आणि जुन्नर, नाशिक, विजापूर, बेळगाव जिल्ह्यात संकेश्वर, चिक्कोडी, अथणी वगैरे ठिकाणी झाला. या सगळ्या परिषदा टिळकपक्षीयांच्या होत्या.

१५ वी प्रांतिक परिषद धुळे येथे २७–२८–२९ एप्रिल १९०८ अशी तीन दिवस ग. व्यं. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. ही परिषद सबंध खानदेश जिल्ह्याची होती. तिला ३०० प्रतिनिधी आणि २०० प्रेक्षक हजर होते. परिषदेपुढील मुख्य ठराव काँग्रेसमध्ये एकी घडवून आणण्याचा होता. त्यावर टिळकांनी लढाऊ भाषण केले. ते म्हणाले " इंग्रज सरकार हे बलाढ्य सरकार आहे. पण आम्ही त्याला साहाय्य करायचे नाही असे ठरवले तर ते चालू शकणार नाही. एखादे राज्य असह्य होत असेल, तर त्याला अडथळा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्रबळ नोकरशाही जुलमी झाली असून लोकांना जी नाडीत आहे. आम्ही आपापसात भांडत आहो. पण सरकार आम्हा दोघांनाही उलथून टाकायला तयार आहे. म्हणून आम्ही एकी केली पाहिजे आणि आमचे सामर्थ्य दाखविले पाहिजे. आमच्याकडून कोटयवधी रुपयें लुबाडले जात आहेत. त्याबद्दल त्यांना जाब विचारला पाहिजे. जो राजा दोन्ही हातानी आम्हाला नागवतो, त्याला आळा बसला पाहिजे. " अशा आशयाचे भाषण करुन टिळकांनी परिषदेकडून संपूर्ण स्वायत्त राज्याची मागणी करणारा ठराव संमत करून घेतला. आचार्य जावडेकर म्हणतात त्याप्रमाणे टिळकांनी प्रथमच या परिषदेत निर्भेळ स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. निदान मुंबई इलाख्यापुरती तरी मवाळ-जहाल एकी घडवून आणण्याकरिता चिं. वि. वैद्य, न. चिं. केळकर वगैरे गृहस्थांची समिती नेमण्यात आली. त्या समितीला मवाळांकडून प्रतिसाद मिळाला नाही. टिळकांच्या लढाऊ भाषणाबद्दल ते देशाला अराजकाकडे नेत आहेत, अशी टीका मवाळांनी केली.

१९०८ नंतर टिळकांच्या बंदिवासामुळे ५ वर्षे परिषद भरू शकली नाही. पण टिळक मंडालेहून सुटण्यापूर्वी टिळकपक्षीयांनी १९१४ मध्ये सातारा येथे दत्तात्रेय वेंकटेश बेळवी यांच्या अध्यक्षतेखाली १६ वी प्रांतिक परिषद भरविली होती. या परिषदेला दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, वीर वामनराव जोशी आदि विदर्भाची प्रमुख मंडळी हजर होती. पुढील कार्याची दिशा ठरविण्याच्या दृष्टीने ही परिषद बोलाविली होती. काँग्रेसमध्ये प्रवेश करावा की नाही याबद्दल बराच वादविवाद झाला. टिळक सुटून येईपर्यंत वाट पहावी असे ठरवून काही निर्णय न घेताच परिषद समाप्त झाली.

१९१४ साली टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतर त्यांनी पुन: आपल्या कार्याला आरंभ केला. त्यांनी २३ आणि २४ एप्रिल १९१५ या दिवशी पुणे येथे प्रांतिक परिषद भरविली. ही १७ वी परिषद असून तिचे अध्यक्ष बॅ. बॅप्टिस्टा होते. टिळकांच्या सुटकेनंतरची पहिलीच परिषद म्हणून तिला महत्त्व होते. बॅ. बॅप्टिस्टा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात 'होमरूल'ची कल्पना मांडली. स्वराज्याची एक योजना आखून होमरूलच्या नावाने तिची सरकारकडे मागणी करावी अशी सूचना त्यांनी केली. तसेच मवाळ-जहाल भेद विसरून सर्वांनी एकत्रितपणे कामाला लागावे असे आवाहन त्यांनी केले. परिषदेत होमरूल लीग स्थापन करण्याच्या उद्दिष्टाने १५ जणांची एक समिती नेमण्यात आली. जहाल-मवाळ समेट घडवून आणण्यासाठी बॅप्टिस्टा, टिळक आणि बेळवी यांची एक समिती नेमण्यात आली. परिषदेला ४०० स्वागत सभासद, ९६० प्रतिनिधी व एक हजार प्रेक्षक उपस्थित होते. टिळकाना प्रतिसाद चांगलाच मिळाला आणि पुन्हा टिळकपक्ष संघटित झाला. या परिषदेत पुढची परिषद बेळगाव येथे घेण्याचे ठरले.

परिषदेच्या ठरावानुसार २८ एप्रिल रोजी पुणे येथे होमरूल लीगची स्थापना रीतसर झाली. तिचा उद्देश साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळविणे हा होता. यापुढे टिळकानी होमरूल लीगच्या चळवळीवरच लक्ष केंद्रित केले.

त्यानंतरची १८ वी परिषद बेळगाव येथे २९ एप्रिल ते १ मे अशी तीन दिवस दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरली, त्यावेळी बेळगावला 'स्वराज्याचा बालेकिल्ला' म्हणत असत. या परिषदेकरिता गंगाधरराव देशपांडे, गोविंदराव याळगी वगैरे मंडळींनी खूपच परिश्रम घेऊन ती यशस्वी केली. या परिषदेला पूर्वीच्या कोणत्याही परिषदेपेक्षा अधिक म्हणजे २२०० प्रतिनिधी व प्रेक्षकसमूह प्रचंड संख्येने उपस्थित होता. मुंबई इलाख्यातील व विदर्भातील टिळक-पक्षाची सर्व मंडळी हजर होती. परिषदेपुढे दोन मुख्य ठराव होते. एक जहाल मवाळ यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याबद्दलचा होता. आणि दुसरा स्वराज्याच्या मागणीसंबंधीचा. याच परिषदेत कॉंग्रेसचे साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे उद्दिष्ट मान्य करून कॉंग्रेसमध्ये प्रवेश करण्याचे ठरले. टिळकांनी त्याचा जोराने पुरस्कार केला. डॉ. मुंजे, शिवरामपंत परांजपे वगैरेंनी कडाडून विरोध केला. पण टिळकांनी त्या सर्वांची समजूत काढून कॉंग्रेस-प्रवेशाचा ठराव एकमताने संमत करून घेतला. म. गांधी या परिषदेला हजर होते व त्यांनी भाषणही केले. या परिषदेमुळे जहालांचा कॉंग्रेस-प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. १९१६ च्या कॉंग्रेसमध्ये सर्व जहाल मंडळी एका गटाने सामील झाली.

त्यापुढची १९ वी प्रांतिक परिषद १७ मे १९१५ रोजी नाशिक येथे भरली. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे जहाल–मवाळांची ही संयुक्त परिषद होती. ना.

श्रीनिवासशास्त्री परिषदेचे अध्यक्ष होते. हा वेळपर्यंत मवाळ पक्ष काँग्रेसबाहेर पडला नव्हता. साम्राज्यांतर्गत स्वराज्याच्या मागणीचा ठराव संमत झाला. त्यावर टिळकांनी भाषण केले ते. म्हणाले, ' स्वराज्य हा आमचा नैसर्गिक जन्मसिद्ध हक्क आहे.' तत्पूर्वी टिळकांनी १६ जून १९१६ रोजी नगर येथील सभेत ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ' हा महामंत्र देशाला दिला होता.

याच काळात दोन वेगळचा प्रांतिक परिषदा भरल्या होत्या. त्यापैकी एक अहमदाबाद येथे मुंबई इलाखा काँग्रेस कमिटीच्या वतीने बॅ. जिना यांच्या अध्यक्षतेखाली १३ मे १९१७ रोजी भरली होती. टिळक त्यावेळी पाहुणे म्हणून हजर होते. पण तीत त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला नाही. न. चिं. केळकर यानी भाग घेतला. टिळकांना या परिषदेत बेळगावच्या प्रांतिक परिषदेच्या काँग्रेस-प्रवेशाच्या ठरावावर शिक्कामोर्तब करून घ्यावयाचे होते. ते त्यांचे कार्य केळकरांमार्फत त्यानी साध्य करून घेतले.

दुसरी परिषद जुलै १९१८ मध्ये गोध्रा येथे भरली होती. ती म. गांधींच्या प्रेरणेने गुजरात सभेच्या वतीने भरली होती. वल्लभभाई पटेल परिषदेचे सेक्रेटरी होते. म. गांधी अध्यक्ष होते. परिषदेला टिळक, खापर्डे, बॅ. जिना, विठ्ठलभाई पटेल, जहांगीर पेटिट, बेझंटबाईचे शिष्य पंढरीनाथ काशीनाथ तेलंग वगैरे मंडळी हजर होती. गांधीपक्ष, टिळकपक्ष आणि बेझंटपक्ष अशी ही संयुक्त परिषद होती. म. गांधींनी आपल्या अध्यक्षीय भाषणात गोरक्षण, अस्पृश्यता-निवारण, स्त्री-शिक्षण, मातृभाषेची अभिवृद्धी या गोष्टींवर भर दिला. त्यांच्या या भाषणाने राजकीय व्यासपीठावर प्रथमच सामाजिक विषयांचा उच्चार झाला.

नाशिकच्या १९ व्या प्रांतिक सभेनंतर सोलापूर येथे २० वी परिषद २–३–४ एप्रिल १९२० या दिवशी न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. टिळकांच्या हयातीतील ही शेवटची परिषद. ही परिषद वादळी ठरली. १९१९ च्या अमृतसर काँग्रेसमध्ये माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांच्या ठरावाच्या बाबतीत मवाळ आणि बेझंटबाईंचा पक्ष यांची पीछेहाट झाली होती. त्याचे उट्टे काढावे म्हणून मवाळ पक्ष आणि बेझंटबाईंचा पक्ष हे विरोध करण्याकरिता सोलापूरला आले होते. त्यांच्या जोडीला नुकत्याच स्थापन झालेल्या ब्राह्मणेतर पक्षाची मंडळीही होती. रँग्लर परांजपे, नामदार कामत, जी. के. देवधर, बॅ. गाडगीळ, वालचंद कोठारी, बेझंटबाई, पंढरीनाथ तेलंग, जमनादास द्वारकादास आणि जेधे पक्षाची मंडळी जय्यत तयारीनिशी आली होती. गावचे वातावरण तापले होते. पत्रके निघत होती. सभा भरत होत्या. परिषदेपुढे सुधारणा कायदा व निवडणुका हा मुख्य विषय होता. परिषद सुरू झाल्यानंतर विरोधकांनी दंगल माजविण्याचा प्रयत्न केला. दगडफेकही झाली. एक पोलीस अधिकारी जखमी झाला. मग मात्र पोलिसानी दंगल मोडून काढली आणि परिषद पार पडली.

टिळकांनी मुख्य ठराव मांडला. ते म्हणाले. "प्रांतिक परिषद ही राष्ट्रीय सभेची शाखा असून राष्ट्रीय सभेने अमृतसर काँग्रेसमध्ये ठरविलेल्या धोरणानेच काम करावयाचे आहे. यास्तव काँग्रेसचा ठराव मान्य असलेल्या उमेदवारांचीच निवड नवीन कायदे कौन्सिलकरिता केली पाहिजे असा हा ठराव आहे." (अमृतसर काँग्रेसने १९१९ चा सुधारणा कायदा हा अपुरा, असमाधानकारक व निराशाजनक आहे, तरी तो जबाबदार पद्धतीचे शासन मिळेपर्यंत राबवावा असा ठराव केला होता). बेझंटबाईनी ठरावाला उपसूचना मांडली की पक्षभेद न मानता सरकारशी सहकार करणाऱ्या लोकांनाच निवडावे. ही उपसूचना प्रचंड मतांनी फेटाळली गेली. टिळकपक्षाच्या दृष्टीने ही परिषद फार यशस्वी झाली. परिषदेत गडबड माजविण्यात रँ. परांजपे यानी भाग घेतल्याबद्दल टिळकांनी १३ एप्रिल १९२० च्या केसरीच्या अंकात 'प्रिन्सिपाल, पशुपाल की शिशुपाल' हा अग्रलेख लिहून टीकेची झोड उठविली. आणि शेवटी बजावले की "तुम्ही शूर असाल, कृतविद्य असाल व देखणेही असाल, पण दरदिवस वाढत चाललेला जो हा लोकमताचा स्वराज्योन्मुख प्रचंड गज, त्याचे तुमच्या हातून आता निवारण होणे शक्य नाही." टिळकांची विरोधकांशी झालेली ही शेवटची लढाई. त्यानंतर १ ऑगस्ट रोजी टिळकांचे देहावसान झाले.

१९२० नंतर म. गांधींनी काँग्रेसची सूत्रे हाती घेतली. त्यांनी काँग्रेसची व्यवस्थित संघटना उभी केली. काँग्रेस आणि काँग्रेस कमिटचा यांच्यामार्फतच चळवळ सुरू झाल्यामुळे प्रांतिक परिषदांना कार्य राहिले नाही प्रांतिक आणि जिल्हा परिषदांची जागा प्रांतिक आणि जिल्हा काँग्रेस कमिटचांनी घेतली आणि त्या कार्यरत राहिल्या. पण तत्पूर्वीच्या युगात प्रांतिक परिषदांनी महत्त्वाचे कार्य केले आहे हे विसरून चालणार नाही.

वर दिलेली प्रांतिक परिषदांची माहिती त्रोटक आहे. त्यासंबंधी अधिक संशोधन करून विस्ताराने माहिती गोळा केल्यास तत्कालीन राजकारणावर अधिक प्रकाश पडू शकेल.

■ ■

Summary

Provincial Committees in the Bombay Presidency and their political role

In this article a brief review has been taken of the important political role in national politics played by Provincial Committees in the Bombay Presidency and how Lok-

manya Tilak shrewdly and intelligently made their use for gaining his political ends. After Tilak's death Mahatma Gandhi emerged as the popular leadar. He organized the Congress party upto the village level by forming Congress Committees. Consequenty, the Provincial Committees of the Tilak Age lost their importance and gradually disappeared.

■ ■ ■

V. P. Bhagwat

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४ : २–४, ऑक्टो. १९८५-एप्रिल १९८६

बालगंधर्व पदवीविषयी

म. श्री. दीक्षित
पुणे

येत्या २६ जून १९८७ रोजी, मराठी रंगभूमीचे सर्वाधिक लाडके गायक स्त्रीनट नारायण श्रीपाद राजहंस तथा बालगंधर्व यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत आहे. यानिमित्ताने बालगंधर्वांसंबंधी आजवर लिहिले गेलेले बहुतेक सर्व ग्रंथरूप वा लेखरूप साहित्य मी माझ्या संकलित पुस्तकासाठी म्हणून वाचले. हे सर्व प्रकाशित साहित्य वाचून झाल्यावर मला बालगंधर्वांच्या चरित्रातील ज्या तीनचार घटना पुरेशा उमगलेल्या नाहीत, त्यापैकी एका महत्त्वाच्या घटनेबाबत या निबंधात काही विचार व्यक्त करीत आहे.

नारायणराव राजहंसांना लो. टिळकांनी 'बालगंधर्व' ही पदवी दिली व तीच पुढें कायमची रूढ झाली ही गोष्ट सर्वांना ज्ञात आहे आणि याविषयी शंकेला जागा नाही. परंतु ही पदवी केव्हा, कोठे आणि कोणत्या निमित्ताने दिली याबद्दल नेमकेपणाने कोणी लिहिल्याचे मला तरी आढळले नाही. उलट याविषयीच्या तपशिलात संभ्रम उत्पन्न व्हावा असाच मजकूर लिहिलेला आढळतो.

'रत्नाकर' मासिकाचा जुलै १९३१ चा बालगंधर्व खास सचित्र अंक म्हणजे बालगंधर्वांसंबंधी प्रकाशित झालेले पहिले सर्वांगीण असे चरित्रसाधन आहे. त्यातील विस्तृत चरित्रपटात, दहावे वर्षी म्हणजे १८९८ साली नारायणरावांचे चुलत चुलते यशवंतराव कुलकर्णी यांनी प्लेगच्या दिवसात खाजगी बैठकीत दहा-पाच मंडळींसमवेत टिळकांना नारायणरावांचे गाणे तासभर ऐकवले व ते ऐकून झाल्यावर त्यांनी खूष होऊन 'अरे तुझा हा नारायण बालगंधर्वच आहे बुवा' असे उद्‌गार काढले अशी हकीकत आहे. श्री. वसंतराव देसाई यांनी आपल्या 'बालगंधर्व' या अधिकृत विस्तृत चरित्रात काळाचा उल्लेख करून जवळजवळ हीच हकीकत दिली आहे. मात्र विश्वकोशाच्या अकराव्या खंडात बालबंधर्वांसंबंधी त्यांनी जे विस्तृत चरित्रटिपण दिले आहे त्यात मात्र हीच हकीकत देऊन 'असा प्रवाद आहे' असा शंकास्पद उल्लेख केला आहे. 'माणूस' साप्ताहिकाच्या १९७१ च्या दिवाळी अंकात श्री. रवींद्र पिंगे यांचा अप्रकाशित, अपुऱ्या, पण अस्सल साधनांवर आधारित शोधनिबंध प्रसिद्ध झाला आहे. त्यात 'रत्नाकरा' मधील हकीकतीलाच दुजोरा आहे. बालगंधर्वांसंबंधी लिहिणाऱ्या सर्वांनीच ही हकीकत

गृहीत धरून आपले लेखन केले असले तरी यापेक्षा एक वेगळी हकीकत किर्लोस्कर कंपनीत असल्यापासूनचे बालगंधर्वांचे एक सहकारी नट कै. य. ना. आठवले यांनी ' सह्याद्रि ' मासिकाच्या ऑगस्ट १९६८ च्या अंकात दिली आहे. ती थोडक्यात त्यांच्या शब्दात अशी– ' पुण्यास एकदा एका समारंभास नारायणराव गेले. त्या ठिकाणी लो. टिळकही आले होते. पंगत चालू होती. लोकमान्य एका मित्राबरोबर काहीतरी चर्चा करीत होते. तेवढ्यात गच्चीवर त्यांना गाण्याचे मधुर स्वर ऐकू आले. त्या मधुर आलापांनी लोकमान्य क्षणभर तेथेच थबकले व स्वयंस्फूर्तीने ' उद्गारले, ' कोणाचे हे स्वर ? हा कोणी बालगंधर्वच गात आहे काय ?' झाले. तेव्हापासून बालगंधर्व नाटकात काम करू लागले व तेही किर्लोस्कर नाटक मंडळीत मुख्य स्त्रीपार्टी म्हणून. या हकिकतीत स्थलकालाचे व प्रसंगाचे बाबतीत मोघमपणा किती आहे ते स्पष्ट आहे.

लो. टिळकांच्या आठवणी-आख्यायिकांचा १९२४ साली जो पहिला खंड प्रसिद्ध झाला त्यात खुद्द बालगंधर्व आणि त्यांचे ' केसरी ' संस्थेतील उपरोक्त आप्त कै. यशवंतराव कुलकर्णी यांच्या आठवणी वाचायला मिळतात. जे कुलकर्णी काका आपल्या पुतण्याचे गाणे लोकमान्यांना ऐकवतात ते या अभिमानास्पद घटने-विषयी एकही पुसट वा सूचक आठवण देत नाहीत याचे आश्चर्य वाटते. बाल-गंधर्वांनी मात्र याबाबतीत दोन आठवणी दिल्या आहेत. त्या अशा–

(लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, खंड १ ला, १९२४ पृ. ४६४–६५)

" सुमारे २४–२५ वर्षांपूर्वीची गोष्ट. मी त्यावेळी ११–१२ वर्षांचा असेन. मी त्यावेळी पुण्यास शिकत असून गाण्याचा नाद मला बराच होता. वाड्यातील कारभारी रा. यशवतराव कुलकर्णी हे माझे आप्त असून त्यांचाही मजवर विशेष लोभ असे व आहे. या सर्व कारणांमुळे वाड्यातील मंडळी मजकडून चीजा, पदे वगैरे नेहमी म्हणवून घेत असत. प्लेगचे दिवस. टिळक बाहेर राहावयास–निकटच्या स्नेही मंडळींच्या किंवा केसरीतील मंडळींच्या असेल, मनात माझे गाणे लोकमान्यां-समोर....तसा योग जुळवून आणला. मला लोकमान्यांच्या कॅम्पात नेण्यात आले. त्यावेळी खूप थंडी–गारठून–आवाजही गारठला होता–शेगड्यांची व्यवस्था–नंतर माझे गाणे झाले–खोलीत येरझारा–लोकमान्यांना विशेष आवड नसताही माझे गाणे ऐकून त्यांनी मला उत्तेजन दिले आणि कौतुकाने व प्रेमाने विचारपूस केली. ' तू येथे काय करीत असतोस ? ' ' मी शाळेत शिकतो व गाण्याचाही अभ्यास करीत आहे. ' ' गायननाटक या अंगावर भर देऊन तोच तू पुढे चालव ' असा उपदेश केला. यानंतर थोड्याच दिवसांनी ' केसरी 'त बालगंधर्व या नावाने लोकमान्यांनी माझा उल्लेख केल्याचे माझ्या ऐकीवात आहे. पदवीदानाने माझे कल्याण होऊन मी कृतार्थ झालो अशी माझी समजूत आहे.

(२) यानंतर बऱ्याच वर्षांनी किर्लोस्कर संगीत मंडळीत मी प्रविष्ट झाल्या-

वर मिरज मुक्कामी काही कामानिमित्त लोकमान्य तेथे आले होते. भेटीत जवळच्या मंडळींना माझा निर्देश करून ' हा कोण माहीत आहे का ? ' असे त्यांना विचारताच लोकमान्यांनी चटकन ' हा आपला बालगंधर्व ' असे उत्तर दिले. त्यांच्या दिव्य व प्रासादिक वाणीतून निघालेला ' बालगंधर्व ' हा आशीर्वाद. '

आता यातील पहिल्या आठवणीवरून गाणे ऐकून ' बालगंधर्व ' पदवी दिली असे बालगंधर्व सांगत नाहीत, तर ' थोड्या दिवसांनी ' केसरी 'त बालगंधर्व या नावाने लोकमान्यांनी माझा उल्लेख केल्याचे माझ्या ऐकीवात आहे ' असा मोघम मजकूर आहे. मनुष्यस्वभाव लक्षात घेता ' केसरी 'चा हा अंक बालगंधर्वांनी पाहिला नसेल काय किंवा संग्रही बाळगला नसेल काय ? असा विचार मनात येतो. ' केसरी 'चे तत्कालीन अंक चाळून पाहिले असता मला असा उल्लेख आढळला नाही. मिरजेच्या आठवणीत पदवीबाबत स्पष्टता अधिक आहे. पण बालगंधर्व किर्लोस्कर कंपनीत मिरजेला असता म्हणजे १९०५ किंवा १९०६ सालात लो. टिळक मिरजेला गेले व तेही किर्लोस्कर कंपनीच्या बिऱ्हाडी गेले याला आधार सापडत नाही.

सारांश, बालनारायणरावांचे गाणे ऐकून लोकमान्यांनी त्याला उत्तेजन दिले आणि बालगंधर्व पदवी दिली एवढेच सत्य हाती गवसते. पण हा प्रसंग केव्हाचा, कुठला याचा पुरेसा मेळ बसत नाही. सप्टेंबर १८९७ ते सप्टेंबर १८९८ या वर्षभरात टिळक कारागृहात होते व नंतरचे दोन महिने सिंहगडावर विश्रांती घेऊन मद्रास–सिलोन ब्रह्मदेश या भागात १८९९ पर्यंत ते फिरतीवर होते. त्यानंतर ते लातूरला गेले होते व १९०१ पासून ताईमहाराज प्रकरणी अनेक वर्षे गुंतून पडले होते. याचा अर्थ १८९८ म्हणजे दहाव्या अकराव्या वर्षी नारायणाचे तासभर गाणे त्यांनी ऐकणे संभवनीय वाटत नाही. माझ्या समजुतीने हा प्रसंग १९०३ च्या जानेवारीत प्लेगाच्या दिवसात फर्ग्युसन कॉलेजजवळील मोकळ्या जागेत लो. टिळक झोपडीत राहत होते त्या अल्पकाळात घडलेला आहे. प्लेगचे दिवस, थंडी इत्यादी तपशील इतर आठवणींतून जो येतो तो याच काळातील आहे आणि यावेळी नारायणराव १४–१५ वर्षांचे म्हणजे ' बालगंधर्व ' वाटावेत इतके गाण्याच्या दृष्टीने पक्व अवस्थेत होते. त्यामुळे दहाव्या वर्षी किंवा १८९८ साल हा तपशील असंभवनीय वाटतो. बालगंधर्वांचे किर्लोस्कर कंपनीपासूनचे सहकारी पांडोबा क्षीरसागर अथवा दादा लाडू किंवा त्यांना सर्वाधिक जाणणारे गणपतराव बोडस याविषयी कसलीही नोंद करीत नाहीत हेही मुद्दाम सांगावेसे वाटते.

नारायणरावांना लोकमान्यांनी ' बालगंधर्व ' ही जी पदवी दिली तिचा पहिला उल्लेख ' सं. मानापमान 'च्या एप्रिल १९११ च्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत नाट्याचार्य खाडिलकरांनी केलेला आहे आणि म्हणूनच या पदवीबाबत कसलीही शंका नाही. विशेष असा की ' मानापमाना 'चा पहिला प्रयोग मुंबईला

१२ मार्च १९११ रोजी झाला आहे. त्यानंतर महिनाभरातच नाटक प्रकाशित झाले आहे. शंका येते ती फक्त स्थळ आणि काळ यांच्याबाबत. पण वर म्हटल्या-प्रमाणे १९०३ च्या प्लेगच्या दिवसात हे पदवीदान घडले असले पाहिजे अशी माझी तमजूत आहे. यानंतर दोनच वर्षांनी त्यांचा मिरजेला किर्लोस्कर कंपनीत प्रवेश झाला आहे.

■ ■

Summary :

About the title Balagandharva

Shri Narayanrao Rajahansa, the famous actor-musician of the early 20th century on the Marathi stage, is known as 'Balagandharva' throughout Maharashtra. It is said that it was Lokamanya Tilak who first bestowed the title 'Bala-gandhava' on Narayanrao after hearing the latter's songs. The present article, with the help of authentic sources, attem-pts to trace the occasion on which Tilak first bestowed this title. All the sources are unanimous that Tilak bestowed the title, but regarding the occasion they give different accounts. The most probable occasion seems to be of 1903, when the Poona city was troubled by plague and Tilak was living in a hut outside the city. According to Balagandharva's memoir, Tilak first heard his song in this hut.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६४ : २–४, ऑक्टो. १९८५–एप्रिल १९८६

मंडळ–वृत्त

१. भा. इ. सं. मंडळाचा अमृतमहोत्सवाचा कार्यक्रम

मंडळाचे अमृतमहोत्सवी वर्ष १९ जुलै १९८५ ते १८ जुलै १९८६ असे साजरे झाले. या निमित्ताने या वर्षात विशेष चर्चासत्रे, परिसंवाद आणि प्रदर्शन इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

१. परिसंवाद

१. भारतातील समाजसुधारणा चळवळी: ऐतिहासिक दृष्टिक्षेप

वरील विषयावर दि. २५ मे १९८६ रोजी एक परिसंवाद संपन्न झाला. त्याच्या अध्यक्षपदी ख्यातनाम समाजसुधारक, साहित्यिक व मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. श्री. शंकररावजी खरात हे होते. परिसंवादाचे उद्घाटन महाराष्ट्राचे अर्थमंत्री ना. श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी केले. परिसंवादात पुढील विद्वानांनी आपले निबंध सादर केले :

(१) श्री. बा. रं. सुंठणकर, (२) प्रा. य. दि. फिडके, (३) डॉ. वा. ना. कुबेर, (४) प्रा. कुमुद पोरे, (५) प्रा. बी. देबरॉय, (६) प्रा. के. श्रीपतिशास्त्री व (७) प्रा. अशोक चौसाळकर. परिसंवादातील निबंधवाचन व चर्चा प्रामुख्याने इंग्रजीतून झाली. परिसंवादात पुण्यातील या विषयात रस असलेल्या व त्याचा अभ्यास केलेल्या अनेक आमंत्रितांनी भाग घेतला होता. प्रस्तुत अंकात, या परिसंवादात वाचले गेलेले निबंध प्रकाशित होत आहेत.

२. मूळ ऐतिहासिक कागदपत्रे

वरील विषयावर २६–५–१९८६ रोजी एक चर्चासत्र झाले. या चर्चासत्राचे अध्यक्षस्थान गोवे राज्याच्या पुराभिलेख व पुरातत्त्व या विभागाचे संचालक डॉ. प्रकाशचंद्र शिरोडकर यांनी भूषविले होते. चर्चासत्राचे उद्घाटन पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. कृ. ना. चिटणीस यांनी केले. या चर्चासत्रात प्रा. बी. डी. कुलकर्णी, श्री. श्रीराम करंदीकर, श्री. अ. रा. कुलकर्णी, श्री. सुरेश इंदूरकर व श्री. सुधीर खरे या संशोधक अभ्यासकांनी आपले निबंध सादर केले.

या चर्चासत्राला जोडूनच महाराष्ट्र–शासनाच्या पुराभिलेख विभागातर्फे ‘मूळ अस्सल ऐतिहासिक कागदपत्रे’ या विषयावर मंडळाच्या दालनात एक महत्त्वपूर्ण प्रदर्शन भरविण्यात आले होते.

३. महाराष्ट्राची ऐतिहासिक वाटचाल

वरील विषयावरील चर्चासत्र तीन दिवसांचे झाले. दि. ४, ५ व ६ जुलै १९८६ या दिवशी झालेल्या या चर्चासत्रास अभ्यासक संशोधक व विद्वान प्राध्यापक हे मोठ्या संख्येने उपस्थित होते व त्यांनी चर्चेत सक्रिय भाग घेतला.

दि. ४ जुलै रोजी झालेल्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डेक्कन कॉलेजचे संचालक प्रा. म. के. ढवळीकर होते. उद्‌घाटन दैनिक 'सकाळ'चे संपादक श्री. एस. के. कुलकर्णी यांनी केले.

या चर्चासत्राचे काळानुसार तीन विभाग पाडण्यात आले होते–१. सातवाहन ते यादव, २. खिलजी ते पेशवाई अखेर व ३. ब्रिटिश काळ.

पहिल्या विभागाच्या अध्यक्षस्थानी प्रा. म. के. ढवळीकर होते. यात डॉ. सौ. शोभना गोखले, प्रा. राजगुरु, डॉ. पप्पू, प्रा. म. श्री. माटे यांनी आपले शोध-निबंध सदीप सादर केले.

दुसऱ्या विभागाच्या अध्यक्षस्थानी मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागाच्या प्रमुख प्रा. आयेशा सय्यद या होत्या. या विभागात प्रा. स. न. आठवले, डॉ. गो. त्र्यं. कुळकर्णी, डॉ. वा. द. दिवेकर, डॉ. कृ. ना. चिटणीस, प्रा. दिलबागसिंग व डॉ. जी. डी. शर्मा यांनी आपले शोध–निबंध सादर केले. यांपैकी दिलबागसिंग हे दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी, आणि शर्मा हे बडोद्याच्या सयाजीराव युनिव्हर्सिटीत प्राध्यापक आहेत.

तिसऱ्या विभागाच्या अध्यक्षस्थानी प्रा. य. दि. फडके होते. यात प्रा. ग. प्र. प्रधान, प्रा. के. मुजुमदार, डॉ. अ. म. देशपांडे, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुषमा वर्मा व डॉ. राजेंद्र व्होरा यांनी आपले निबंध सादर केले.

या तीन दिवस चाललेल्या चर्चासत्राचा समारोपाचा कार्यक्रम मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. वि. त्र्यं. शेटचे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यात चर्चासत्रासंबंधी आपले एकंदरीत झालेले मत व चर्चासत्राचा फलितांश यावर प्रा. के. मुजुमदार, डॉ. ना. ह. कुलकर्णी प्रभृतींनी आपले विचार मांडले. समारोपाचे मुख्य भाषण प्रा. य. दि, फडके यांनी केले. 'महाराष्ट्रेतिहासाच्या संशोधनाच्या काही दिशा व त्यावरील साधने' हा त्यांच्या भाषणाचा मुख्य विषय होता.

प्रदर्शन

मंडळाने अमृतमहोत्सवानिमित्त गतवर्षीपासून वेळोवेळी विविध प्रदर्शने भरविली. त्यातील ऐतिहासिक कागदपत्रे या विषयावरचे प्रदर्शन यावर्षी दि. ९ ते २५ सप्टेंबर १९८६ रोजी भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. वि. ग. भिडे यांचे हस्ते झाले. त्याआधी डॉ. भिडे यांनी मंडळकार्याची पाहणी करून समाधान व्यक्त केले. या प्रदर्शनास अभ्यासकांचा व सामान्य नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

२ वार्षिक संमेलन

प्रतिवर्षाप्रमाणे मंडळाचे संमेलन ३१ मे, १ व २ जून १९८६ या तीन दिवशी पार पडले. या संमेलनात एकूण २७ निबंध सादर करण्यात आले. निबंध वाचक, त्यांचे विषय व त्या त्या सत्रांचे अध्यक्ष पुढीलप्रमाणे होते :

२. वार्षिक संमेलन : निबंधवाचन

शनिवार दि. ३१-५-८६ सकाळी ८-३० ते १०-३०

अध्यक्ष : प्रा. रा. शं. वाळिंबे

(१) परांजपे, वि. वा. – कालिदाससप्तयुक्तानि विशेषनामानि
(२) दीक्षित, हे. वि. – शातवाहन शक नागवंशीय होते का ?
(३) थिटे, ग. ऊ. – वैदिक अभिचारविधि
(४) सुंठणकर, बा. रं. – इल्बर्ट विल आणि गोऱ्यांचे बंड

सायंकाळी ५-३० ते ७-३०

अध्यक्ष : प्रा. स. न. आठवले

(५) मालशे, प. त्रि. व घोडे एस्. के. – पंढरपूरचा धार्मिक भौगोलिक अभ्यास
(६) ढेकणे, के. डी. – राजर्षी शाहू महाराजांची शेतीव्यवस्था
(७) शाळिग्राम, य. वि. – सरस्वती नदीचे उत्खनन शक्य आहे का ?
(८) ढवळीकर, म. के. – वाळकी येथील उत्खनन (सदीप)

रविवार दि. १-६-८६ सकाळी ८॥ ते १०॥

अध्यक्ष : प्रा. स. मा. गर्गे

(१) मुंडी, बा. ना. – रागशिरोमणी : संगीतावरील एक जुना ग्रंथ
(२) जोशी, प्रकाश – प्राचीन भारतातील न्यायपद्धती
(३) आरोळे, मीरा – कथासरित्सागर आणि न्यायपद्धती
(४) मंजूळ, वा. ल. – काही अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथ

सायंकाळी ५-३० ते ७-३०

अध्यक्ष : श्री. वि. त्र्यं. शेटे

(१) सुंठणकर, बा. रं. – १९ व्या शतकातील महाराष्ट्राचे पुनरुत्थान
(२) सोवनी, म. वि. – मंगळसूत्र : स्त्रियांच्या सौभाग्य अलंकारासंबंधी अधिक नवी माहिती
(३) कुलकर्णी, अ. रा. – A new stone-inscription
(४) गोखले, शोभना – कान्हेरी येथील दीपतारेचे शिल्प
(५) शिंदे, वसंत – महाराष्ट्रातील उत्तर सिंधु संस्कृती : वैशिष्टये व वसाहतरचना

सोमवार दि. २–६–८६ सकाळी ८॥ ते १०॥

अध्यक्ष : डॉ. म. श्री. माटे

(१) कानडे, मु. श्री. – एका रामदासी कवीने गायिलेला संत तुकारामांचा महिमा
(२) जैतली, कृ. टो. – भारत आणि प्राचीन इजिप्त यांचे सांस्कृतिक ऐक्य
(३) मराठे, ना. बा. – प्राचीन भारतीय लिपी
(४) करंदीकर, श्रीराम – ब्रिटिशकालीन काही सनदापत्रे

सायंकाळी ५–३० ते ७–३०

अध्यक्ष : डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी

(१) खोबरेकर, वि. गो. – मुंबईतील स्वातंत्र्यचळवळ, १८२० ते १९२०
(२) रानडे, उषा – तंजावर मराठी : काही भाषिक वैशिष्टये
(३) चव्हाण, कमल – आधुनिक चित्रकलेविषयी राजवाडे यांचे विचार
(४) अत्रे, शुभांगना – सिंधुसंस्कृतीची अधिष्ठात्री देवता
(५) गंधे, वसुधा – गोसव : एक विचार

३. पाक्षिक सभा :

(२१–११–८५ ते ३१–३–८७)

दिनांक	विषय	वक्ते
३–१२–८५	अहमदाबाद येथे झालेल्या अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेची माहिती	श्रीकांत बहुलकर शि. द. जोशी मो. ग. धडफळे सरोजा भाटे, वा. ल. मंजूळ, प्रतिभा कोल्हकर
१–१–८६	रामशास्त्री यांची न्यायनिवाड्याची कागदपत्रे	सदाशिव आठवले
	कै. गोविंद बाबाजी जोशी यांची डायरी	बा. रं. सुंठणकर
१५–१–८६	रामशास्त्री प्रभुणे यांची न्यायनिवाड्याची कागदपत्रे	सदाशिव आठवले
	काही अप्रसिद्ध कागद	श्रीराम करंदीकर
	पेठ शिवपुरी येथील शेटेपणाचे वतन	सुधीर खरे
५–२–८६	सोलापूर येथे झालेल्या महाराष्ट्र इतिहास परिषदेची माहिती	कृ. ना. चिटणीस शोभना गोखले भगवान कुलकर्णी
१९–२–८६	(१) रामशास्त्री प्रभुणे यांचीं न्यायनिवाड्यासंबंधी पत्रे	सदाशिव आठवले

	(२) मेहेतरपणासंबंधी एक कागद	सुधीर खरे
	(३) माधवराव पेशव्यांची काही पत्रे	राम करंदीकर
५–३–८६	(१) पुणे शहराच्या अडती अधिकारासंबंधी काही माहिती	म. रा. कुलकर्णी
	(२) काही अप्रसिद्ध कागद	सुधीर खरे
	(३) न्यायनिवाड्यातील दिव्य	मा. मो. ओंकार
१६–३–८६	(१) जबलपूर येथे झालेल्या एपिग्राफिकल सोसायटीच्या अधिवेशनाची माहिती	अ. रा. कुलकर्णी विदा परांजपे
२–४–८६	पुणे प्रांताचा शिवकालीन कौलनामा	डॉ. मधुकर कुलकर्णी
	गुजराथमधील इनाम चौकशी	श्री. मा. मो. ओंकार
	(१) चांदवडी रुपयासंबंधी माहिती	श्री. सुधीर खरे
	(२) पुणे हडोली महाराज वतन	
१६–४–८६	काही अप्रसिद्ध कागद.	श्री. मा. मो. ओंकार
	कोतवालीसंबंधी काही चिठ्ठ्या.	डॉ. मधुकर कुलकर्णी
७–५–८६	औरंगाबाद सुभ्याचा स्वराज्य अंमल	श्री: मा. मो. ओंकार
	काही अप्रसिद्ध कागद	ॲड. श्रीराम करंदीकर
२१–५–८६	मराठे-इंग्रज युद्धासंबंधात महादजी शिंदे यांचा सल्ला	श्री. मा. मो. ओंकार
	धर्माधिकारी व आठघरे यातील तंटा	श्री. सुधीर खरे
	काही अप्रसिद्ध कागद	ॲड. श्रीराम करंदीकर
१८–६–८६	पुण्यासंबंधी काही माहिती	श्री. मा. मो. ओंकार
	मौजे पिंगोरीच्या पाटीलकीचा शिवकालीन महजर	डॉ. मधुकर कुलकर्णी
	काही अप्रसिद्ध कागद	श्रीमती मंजिरी ठुसे
	रेवदंड्यातील बागायतीसंबंधीची कलमबदी	श्री. सुधीर खरे
२३–७–८६	काही अप्रसिद्ध माहिती	श्री. मा. मो. ओंकार
	इसवी १८२७ चा जमीनझाडा	श्री. सुधीर खरे
६–८–८६	मोगल-मराठे संबंध	श्री. मा. मो. ओंकार
	अर्वाचीन काळातील पहिली राजकवयित्री जानकीबाई पटवर्धन हिच्याविषयी माहिती	श्री. बा. रं. सुठणकर
	इसवी १८७० पूर्वीची मराठी वर्तमानपत्रे	ॲड. श्रीराम करंदीकर

२०-८-८६	काही अप्रसिद्ध माहिती	श्री. मा. मो. ओंकार
	इसवीं १८७० पूर्वीची मराठी वर्तमान-पत्रे	अॅ. श्रीराम करंदीकर
	मौजे हेरवडसंबंधी करार	श्री. सुधीर खरे
३-९-८६	छत्रपति प्रतापसिंह महाराजांचे रंगो बापूजीस मुखत्यारपत्र	श्री. मा. मो. ओंकार
	इसवी १८७० पूर्वीची मराठी वर्तमान-पत्रे	अॅड. श्रीराम करंदीकर
१-१०-८६	पुनवळी येथील शेतकरी कुटुंबाचा शेतीचा जमाखर्च	सौ. अंजलीबाई निलंगेकर
	इसवी १८३० मधील कसबे सोलापूर येथील जमीनमहसूलविषयक नवीन धोरणाचा जाहीरनामा	श्री. सुरेश इंदुरकर
	पेशव्यांचे दैनंदिन अखबार	अॅड. श्रीराम करंदीकर
५-११-८६	औरंगजेबाचे अखबार	डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी
	बादशहाकडून आलेल्या मोरचेलाच्या स्वीकार समारंभाचे वर्णन	श्री. मा. मो. ओंकार
१२-११-८६	कलकत्ता येथे झालेली अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद	डॉ. ग. बा. पळसुले डॉ. श्रीकांत बहुलकर डॉ. सरोजा भाटे डॉ. प्रभाकर आपटे डॉ. ग. ऊ. थिटे श्री. वा. ल. मंजूळ
३-१२-८६	श्रीरामजन्मभूमी आणि बाबरी मशीद	श्री. बा. रं. सुंठणकर
	सुमारे इ. १८३० मधील पुणे सुभ्यातील जमाबंदी ठरविण्याची हिशेब पद्धती	श्री. सुरेश इंदुरकर
	इ. १८३० चा भिमथडी परगण्यासंबंधी रॉबर्ट ग्रिगेल याचा पैमाषविषयक जाहीरनामा	सौ. अंजली निलंगेकर
१६-१२-८६	काही अप्रसिद्ध माहिती	श्री. मा. मो. ओंकार
	प्राचीन ग्रंथातील प्रकरण नावे एक टिपण	श्री. ना. बा. मराठे
७-१-८७	मोगलाईतील इनामे	श्री. मा. मो. ओंकार
	सव्वाशे वर्षांपूर्वीचे पुणे	श्री. म. श्री. दीक्षित

	काही अप्रसिद्ध कागद	ॲड. श्रीराम करंदीकर
२१–१–८७	मोगलाईतील इनामे	श्री. मा. मो. ओंकार
	इ. १८९६ च्या दुष्काळासंबंधी महसूलखात्याचा एक उतारा	श्री. बा. रं. सुंठणकर
	पेशव्यांच्या अखबारातील महत्त्वाची टिपणे	ॲड. श्रीराम करंदीकर
४–२–८७	मद्रास येथे झालेली दक्षिण भारत इतिहास परिषद	डॉ. कृ. ना. चिटणीस प्रा. रवींद्र लोणकर प्रा. भ. दे. कुलकर्णी
१८–२–८७	लखनौ येथे झालेले अभिलेख आयोगाचे अधिवेशन	डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी डॉ. अ. म. देशपांडे डॉ. वा. द. दिवेकर
४–३–८७	मोगलाईतील इनामे	श्री. मा. मो. ओंकार
	सोलापूर येथील वाहतूकभाड व जकात यासंबंधी इ. स. १८३० मधील दर.	श्री. सु. व्यं. इंदुरकर
	जोगेश्वरी देवस्थानाबद्दल माहिती	डॉ. म. रा. कुलकर्णी

४. स्मृतिदिन–सभा

प्रा. ग. ह. खरे स्मृतिदिन

दिनांक : २४–६–८६
वक्ते : डॉ. बा. के. लेले
विषय : ज्ञानेश्वरीचा शास्त्रीय अभ्यास

बाळशास्त्री जांभेकर स्मृतिदिन

दिनांक : १३–८–८६
वक्ते : श्रीमती ॲना फेल्डहाऊस
विषय : महानुभावांचा महाराष्ट्र

द. वा. पोतदार स्मृतिदिन

दिनांक : १९–१०–८६
वक्ते : डॉ. व्ही. एन्. मिश्रा
विषय : ओरिजिन्स ऑफ आर्ट

रामचंद्रबाबा सुखठणकर स्मृतिदिन

दिनांक : १–१२–८६
वक्ते : प्रा. व. दि. कुलकर्णी
विषय : थोरले माधवराव पेशवे : सत्य आणि कल्पित

वि. का. राजवाडे स्मृतिदिन

दिनांक : २८-१२-८६
वक्ते : डॉ. र. वि. हेरवाडकर
विषय : इतिहासाचार्य राजवाडे आणि बखर-संशोधन

ज्ञानेश्वरी पुण्यतिथी

दिनांक : १७-१-८७
वक्ते : प्रा. म. रा. जोशी
विषय : ज्ञानेश्वरी-संशोधनातील एक नवी दिशा

दिनांक : १९-१-८७
वक्ते : प्रा. म. वा. धोंड
विषय : विश्व ब्रह्मची केले

■ ■ ■

वाचकांचा पत्रव्यवहार

The Editor,

Quarterly Journal of the

Bharat Itihas Samshodhak Mandal

Sir,

This has a reference to the Quarterly issue, Vol. 63, Nos. 3–4, Jan–April 1985, publishing the historical documents of the Nawabs of Savanur. Please allow me to point out the factual error that has crept in regarding the identification of Khawas Khan, in the introductory note.

On page 2 and 9 in Para 2 there is a reference to Khawas Khan, who after the death of Ali Adi Shah II in 1672, ousted Abdul Karim Miana from power and managed to get the regency. And this Khawas Khan has been referred to as Daulat Khawas Khan. I contend that identifying this Khawas Khan as Daulat Khawas Khan is an error. I further contend that it is not fully correct to say that Khawas Khan " managed to get the regency ousting Abdul Karim ", though the latter " finally succeeded in getting rid of....Khawas Khan by encompassing his murder, and seized the regency to himself " is correct. I elaborate below.

Daulat Khawas Khan (name Daulat Yar) was a convert Moslem, who got the title Khawas Khan by Muhammad Adil Shah (1627–1656) for assisting Mustafakhan (Mirza Muhammad Amin Lari) towards Muhammad Shah's ascendancy to the throne succeeding Ibrahim Adil Shah II (1580–1627). He usurped power ousting Mustafa Khan in 1633 and virtually ruled the state without the title of the Prime Minister till his murder in 1635. The important role played by Murar Pandit – Murar Jagdeo, the favourite and the right–hand

man of Daulat Khawas Khan– in the early life of Shahaji Bhosale is all too well known.

In the context of the introductory note the person named Khawas Khan was the Abyssinian chief of the Deccani Muhammedans and was the second of the four sons of Siddi Raihan (titles : first Ikhlas Khan, later Khan Muhmmad, Muzaffar-ud-din Khan-i-Khanan; Vazir, 1648–57). It may be noted that Siddi Raihan brought about the murder of Daulat Khawas Khan, noted above, at the instance of Muhammad Adil Shah. This Khawas Khan Habsi had earlier distinguished himself in the Adilshahi wars with Shivaji (1664) and Mirza Raja Jaising (1665–66). He was the enemy of the Afghan faction in the court.

Regarding the inaccuracy of the statement that Khawas Khan, now identified as Khawas Khan Habsi, " managed to get the regency ousting Abdul Karim " it may be noted that on the eve of the death of Ali Adil Shah II the then Vazir Abdul Muhammad declined to be regent for Sikandar Adil Shah (1672–86) and at the instance of dying king a tetrapartite plan of management of the kingdom by four leading nobles was agreed to according to which Khawas Khan Habsi was to be the regent holding the capital. On his assuming powers after the demise of Ali II and the accession of Sikandar, Khawas Khan broke the agreement and refused to yield the forts to the nobles of which Abdul Karim Miana was one and was to hold the western side of the kingdom to watch Shivaji's movements. Thus it is doubtful whether Abdul Karim was one of the direct contenders for the regency; and it was not he but Abdul Muhammad, under whose direct say the former functioned, was ousted in the sense that he left the court in disgust on Khawas Khan not yielding to agree to the plan noted above. In the subsequent manoeuverings by the Afghan faction their leader Abdu

Karim (title Bahlol Khan) who was holding the position of commander–in–chief, managed to invite Khawas Khan to dinner, arrested and sent him to Bankapur where the former's fief lay, on 11th Nov. 1675. Thus deposing Khawas Khan he snatched the regency and subsequently got Khawas Khan murdered on 20th Jan. 1676.

Thanking you,

Youre faithfully

Gokhale Institute of Politics and Economics, PUNE – 4

A. R. Kulkarni

References

1. Zuberi, Muhammad Ibrahim, *Basatin-us-Salatin*, Marathi translation by Parasanis, ed. V. S. Bendre, pp. 290–91, 294, 324–30, and 483–88, 489ff, 500–01, 503–04.
2. Sarkar, Jadunath, *Aurangzeb*, Vol. 4, Chapt. 42
3. Sarkar, J., *House of Shivaji*, Chapt. 6.
4. Eliot and S. Dowson, *The history of India as told by its own historians*, Abdul Hamid Lahori, Badshah Nama, Vol. VII, p. 28.

■ ■ ■